# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३**

## नगर विकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ९०**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०७०, इतर प्रशासनिक सेवा**<br>**रूपये:- २२,२६,४७,०००/-**<br>**श्रीमती जयश्री जाधव** |
| (१) | ५६१२ | १० | कोल्हापूर,शहर हे तीर्थक्षेत्र आहे त्यामुळे दररोज लाखो भाविक व पर्यटक दररोज येत असतात,तसेच शहरात सद्या कावळा नाका,महानगर पालिका कार्यालय शेजारी व बावडा या तीन ठिकाणी , टिंबर मार्केट,शास्त्री नगर मैदान,फुले वाडी बस स्टॉप ,लक्ष्मी पुरी,याच ठिकाणी फायर ब्रिगडच्या सोई उपलब्ध असणे,परंतु, सदर ठिकाणी जुन्या गाड्या, फायार्वाहान असणे,तसेच सदर च्या इमारती मोडकळीस आलेल्या असणे,तमुळे शासनाने तातडीने सदर ठिकाणी नवीन अग्निशमन वाहने खरेदी करावी या प्रमुख मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांची असणे,त्यामुळे शासनाने कोल्हापूर शहरासाठी अग्निशमन दलाला विशेष निधी देण्याची आवश्यकता,यासाठी शासनाने करावयाच्या उपाय योजना,करावी ही नम्र विनंती. |
| | | | **श्री. दिलीपराव बनकर** |
| (२) | ५६०२ | १० | ओझर मिग हि नगरपरिषद नव्यानेच अस्तित्वात आलेली असून या नगरपरिषदेची सन २०११ च्या जणगणनेनुसार ५४०६९ इतकी लोकसंख्या आहे. मात्र सद्यस्थितीत ७५००० हजाराच्यावर या शहराची लोकसंख्या गेलेली असून या ठिकाणी मोठी बाजारपेठ असून कापड दुकानाचे मोठे होलसेल केंद्र या ठिकाणी असल्याने मोठ-मोठे साठवण गृह येथे उपलब्ध आहे. त्यामुळे या शहराच्या ठिकाणी अग्निशमन सारखी सुविधा उपलब्ध होणे अतिशय गरजेचे असणे. अग्निशमन व्यवस्था वा अग्निशमन स्थानक बांधकामासाठी सातत्याने मागणी केलेली असणे परंतु याबाबत कुठल्याही प्रकारची कार्यवाही शासन स्तरावरून अद्यापपर्यत झालेली नाही. त्यामुळे येथील अग्निशमन सुविधेसाठी मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याची असलेली नितांत आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**रूपये:- १,६३,६२,४९,०५,०००/-**<br>**श्री. अबू आजमी** |
| (३) | ५५९२ | १०० | जिल्हा ठाणे, बदलापूर (पूर्व) स्टेशन येथील रस्त्यालगत अवैध फेरीवाले गेली अनेक वर्षापासून स्टेशन लगत पदपाथवर बसत असल्यामुळे तेथील नागरिकांना कामावर जाताना व घरी जाताना खूप त्रास सोसावा लागतो सदरहू नगरपरिषदेचे काही अधिकारी कर्मचारी त्या फेरीवालाकडून तेथे बसल्यामुळे त्यांच्याकडून बेकायदेशीर पणे पैसे कमवत असतात. तेथील नागरिकांना होणाऱ्या त्रासाबाबत तक्रार दाखल तक्रार दाखल करूनही अद्याप तेथील फेरीवाल्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नसून शासनाने यावर करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | ५५९७ | १०० | दादर मुंबई येथील रेर्नसन कन्सट्रक्शन यांनी झो.पु.प्रा. परिपत्रक क्र. ५३ चा लाभ/सूट घेऊन प्रकल्पग्रस्त सदनिका महापालिकेस उपलब्ध न करता विकासक यांनी सदर मालमत्तेमध्ये महापालिकेचे ३० करोड रुपयांचे अतिरिक्त विकास क्षेत्र व ३० करोड रुपयांची ३८ प्रकल्पग्रस्त सदनिका गिळंकृत केले, तासेच सदर योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात झो.पु.प्रा. शासकीय व मुंबई महानगरपालिका अधिकारी वर्गाने सदर विकासाच्या ६० करोडच्या आर्थिक फायद्याकरिता मोठ्या प्रमाणात अनियमितता केल्याबाबत दि.१/११/२०२२ रोजी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना योगेश खेमकर यांनी तक्रार दिली होती परंतु मुंबई महापालिका व झो,पु.प्रा. यांनी वेळोवेळी आर्जादाराच्या तक्राराला बगल देऊन व शासनाला खोटा अहवाल सादर करून अप्रत्यक्षरीत्या गैरव्यवहारातून विकासकाम संबंधित जबाबदार शासकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या अनागोंदी कारभाराबाबत शासनाचे झालेले आतोनात नुकसान व फसवणुकीसाठी विकासकाकडून करोडोंच्या महसूल वसूल करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक खाते व गुन्हे अन्वेष विभाग. पुणे यांच्याकडून सखोल चौकशी होण्याकरिता शासन स्तरावर ठोस कारवाई करण्याची आवश्यकता असल्याने शासनाने गांभीर्याने दखल घेऊन करावयाची कडक कारवाई. |
| (५) | ५६०९ | १०० | मुंबई स्थित मानखुर्द – शिवाजीनगर विधानसभा क्षेत्र हा मोठ्या प्रमाणात झोपडपट्टी असलेला विभाग असून विभागातील रस्त्याच्या दोन्ही बाजूने अवैधरीत्या फेरीवाले त्यांचे हातगाड्या लावत असल्याकारणाने सदर विभागातील नागरिकांना जाण्या येण्यास समस्या निर्माण होत आहे. सदर विभागात आगी सारखी मोठी दुर्घटना घडल्यास अशावेळेस फेरीवाल्यामुळे रुग्णवाहिका, अग्निशामक दल च्या गाड्या जाण्यास त्रास निर्माण होणे, महानगरपालिका अंतर्गत असणाऱ्या रस्त्यांच्या बाजूने अवैधरीत्या उभे असलेल्या फेरीवाल्याबद्दल वारंवार तक्रार करूनही सदर विषयी संबंधितांवर कोणतीही कारवाई न होणे, महानगरपालिका चे अधिकारी, कर्मचारी फेरीवाल्याकडून पैसे कमवत असणे, सदर विषयी शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. राजेश एकडे** |
| (६) | ५७०३ | १० | मलकापूर विधानसभा मतदार संघातील (जि.बुलडाणा) मलकापूर शहर ही "ब" वर्ग नगर पालिका आहे. मलकापूर शहराचे शहरीकरण दिवसेंदिवस वाढत आहे. मलकापूर शहरात वारंवार पाणी पुरवठा वितरणाच्या जलवाहिन्याची गळती होते. सदर वितरण वाहिका 51वर्षे जुन्या आहेत. त्यावेळेसची लोकसंख्या व आज रोजीची लोकसंख्या यात प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे वितरण वाहिका अद्यावत करून मुबलक पाणी पुरवठा वेळोवेळी करणे आवश्यक आहे. लोकांना त्याकरिता न.प. ने प्रस्ताव तयार केला असुन सदर प्रस्ताव तांत्रिक मान्यता शासनस्तरावर प्रलंबीत आहे. यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल केदार** |
| (७) | ५७३४ | १० | सेंट्रल इंग्लिश स्कूल व सेंट्रल ऊर्दू हायस्कूल, सावंतवाडी ,जिल्हा सिंधुदूर्ग या शाळेतील खेळाच्या मैदानात अनाधिकृतपणे मधोमध श्री इम्पतियाज खानाली यांनी भिंत बांधली असणे, भिंत बांधल्यामुळे मुलांना खेळण्यास अडथळा निर्माण होत असणे, यासंदर्भात मुख्य अधिकारी, नगरपरिषद, सावंतवाडी यांच्याकडे दिनांक १० फेब्रुवारी,२०२३, २० जानेवारी,२०२३ रोजी तक्रार केली असणे, परंतु अद्याप त्या तक्रारीवरर कोणतीच कार्यवाही झाली नसणे, तसेच अनाधिकृत भिंतीचे बांधकाम तोडले नसणे, बांधकाम तोडण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने अक्षम्य दुर्लक्ष, स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **श्री. मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक** |
| (८) | ५१९८ | १० | मालेगांव (जि.नाशिक ) शहराला दरवर्षी कचरा –निर्मूलनाकरिता करोडोचा ठेका दिला जात असतानाही शहरात सर्वत्र कच-यांचे पसरलेले साम्राज्य, शहराला बकाल आलेले स्वरâप, शहरालगत सोयगावच मुख्य रस्त्यांवर चौकात मोकळया प्लॉटवर ओपन स्पेसमध्ये हजारो टन प्लॉस्टिक कचरा पडून असणे, तसेच भटक्या जनावरे प्लॉस्टिमधील अन्न पदार्थ खात असल्याने जनाव-याचा जीव धोक्यात येउâन सर्वत्र रोगराई पसरण्याची निर्माण झालेली भिती, सोयगांव ,टैहेरे चौफुली ते डी.के चौकादरम्यान मुख्य रस्त्यावरच दहा ते पंधरा ठिकाणी मोठया प्रमाणात प्लॉस्टिक कच-यांचे ढिग, परिणामी परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करâन दोषी ठेकेदार ,संबंधित अधिकारी यांच्यावर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिâया व भूमिका .लेगांव (जि.नाशिक ) शहराला दरवर्षी कचरा –निर्मूलनाकरिता करोडोचा ठेका दिला जात असतानाही शहरात सर्वत्र कच-यांचे पसरलेले साम्राज्य, शहराला बकाल आलेले स्वरâप, शहरालगत सोयगावच मुख्य रस्त्यांवर चौकात मोकळया प्लॉटवर ओपन स्पेसमध्ये हजारो टन प्लॉस्टिक कचरा पडून असणे, तसेच भटक्या जनावरे प्लॉस्टिमधील अन्न पदार्थ खात असल्याने जनाव-याचा जीव धोक्यात येउâन सर्वत्र रोगराई |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | पसरण्याची निर्माण झालेली भिती, सोयगांव ,टैहेरे चौफुली ते डी.के चौकादरम्यान मुख्य रस्त्यावरच दहा ते पंधरा ठिकाणी मोठया प्रमाणात प्लॉस्टिक कच-यांचे ढिग, परिणामी परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी करून दोषी ठेकेदार ,संबंधित अधिकारी यांच्यावर कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका . |
| | | | **श्री. कैलास गोरंट्याल** |
| (९) | ५६८८ | १०० | मुलुंड (पश्चिम), मुंबई येथील ॲटमॉसपियर रियालिटी या इमारतीच्या समोरील मुलुंड-गोरेगांव लिंक रोडवर मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत असणे, या वाहतुक कोंडीमुळे या परिसरात रहात असलेल्या अनेक नागरिकांना वाहनांच्या अपघातामुळे अपंगत्व पत्करावे लागलेले असणे, तसेच या वाहतुक कोंडीमुळे होणाऱ्या कर्णकर्कश आवाजामुळे स्थानिक नागरिकांना बहिरेपणा येण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, या ठिकाणी तातडीने सिग्नल यंत्रणा बसविण्यात यावी अशी मागणी स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा शासनाकडे करुनही याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. शिरीष चौधरी** |
| (१०) | ५७१९ | १० | जळगांव जिलहयातील रावेर नगरपरिषद हद्दीमध्ये विकासात्मक कामे करण्याची आवश्यकता असुन रावेर नगरपरिषद वाढीव हद्दीत नवीन पिण्याच्या पाण्याची HDPE पाईपलाईन टाकणे. रावेर नगरपरिषद वाढीवहद्दीतील भागामध्ये नवीन स्ट्रीट लाईट लावणेकरीता रस्त्यांचे सर्वेक्षण करून व त्या अनुषंगिक कामे महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी च्या मार्गदर्शक तत्वानुसार करणे.रावेर नगरपरिषदेच्या वाढीव हद्दीत नवीन रस्ते व गटारी बांधणे.इत्यादी कामे करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (११) | ५६३० | १० | ता. पुरंदर, जि. पुणे येथील स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्ये उच्चतम कामगिरी करणाऱ्या सासवड व जेजुरी नगरपरिषदेस प्रोत्साहनात्मक बक्षीसाची रक्कम वर्ग करणेबाबत. सासवड व जेजुरी नगरपरीषद ह्या पुणे जिल्ह्यातील "क- वर्ग" नगरपरीषद क वर्ग असल्याने यांच्याकडे उत्पन्नाचे स्त्रोत नाही. सदर नगरपरिषदा ह्या ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक परंपरा असलेले विकसनशील शहर असून सासवड हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून नागरीकांना मुलभुत सोयी-सुविधा देण्यामध्ये महाराष्ट्रात अग्रेसर नगरपरीषद असून स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्येही नगरपरिषदेनेही उच्चतम कामगिरी केल्याने संदर्भीय शासन निर्णयानुसार एकूण १५ कोटी रकमेची बक्षीस मंजूर झालेले होते.तसेच जेजुरी नगरपरिषदेस स्वच्छ सर्वेक्षण २०२० अंतर्गत देशात ६ वा व पश्चिम विभागात द्वितीय क्रमांकासह बेस्ट सेल्फ सस्टेनेबल सिटी पुरस्कार मिळविलेला आहे. त्यानुषंगाने स्वच्छ सर्वेक्षण २०२० स्पर्धेसाठी मानांकन प्राप्त नगरपरिषदेला बक्षिस म्हणून जाहिर केलेले होते.परंतु या दोन्ही नगरपरिषदांना अद्यापपर्यंत प्रोत्साहनात्मक अनुदान प्राप्त झालेले नाही. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१२) | ५६३५ | १० | पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील नव्याने सामाविष्ट झालेल्या गावातील अनियमित पाणीपुरवठ्याबाबत.... माझे कार्यक्षेत्रातील पुणे महानगरपालिकेत सामाविष्ट झालेल्या गावात वाढत्या नागरीकरणामुळे सहकारी गृहरचना संस्था(हौसिंग सोसायटी) यामध्ये वाढ झालेले आहे. महानगरपालिकेकडून १००% कर आकरले जाते परंतु सोयीसुविधा अपुऱ्या दिले जात असल्याची भावना या गृहरचना संस्थेच्या निवासी नागरीकांच्या मनात निर्माण झालेली आहे.मनपा हद्दीतील हौसिंग सोसायट्यामध्ये १ किंवा ३ दिवसाआड कमी दाबाने फक्त ३० ते ५० मिनीटे पाणी महानगरपालिकेकडून पाणीपुरवठा केला जात असल्याने येथील नागरीकांना टॅकरद्वारे पाणी विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे नागरीकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याने सर्वत्र रोषाचे वातावरण निर्माण झाल्याने या गावांना सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी निधी मिळावा. |
| | | | **श्रीमती जयश्री जाधव** |
| (१३) | ५५१९ | १० | कोल्हापूर शहरात ऐतिहासिक वारसा लाभलेला असल्याने सदर ठिकाणी जगप्रसिद्ध अंबाबाई मंदिर असले त्यामुळे सदर ठिकाणी भाविक भक्त पर्यटक मोठ्या प्रमाणात येत असतात परिणामी पाहिजे त्या प्रमाणात शासनाकडून भाविकांना मूलभूत सुविधा पुरविण्यात अद्यापी अपयशी आले नसणे त्यासाठी सदर ठिकाणी विकास करण्यासाठी सुमारे ७९.९६ कोटी रुपयांचा तीर्थक्षेत्र आराखडा याच प्रशासकीय मान्यता दिलेली असणे परंतु सदर आराखड्यास उर्वरित निधी अद्याप शासनाकडून देण्यात आलेल्या नसले त्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबंधित कोल्हापूर पालकमंत्री यांच्याकडे मागणी केली असणे त्यामुळे शासनाने उर्वरित सुमारे ७१.७६ कोटी निधी शासनाने त्वरित देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली असणे असणे परंतु उपरोक्त मागणीबाबत शासनाने अद्याप कोणतीच तरतूद केल्याचे आढळत नाही त्यामुळे शासनाने तातडीने निधी वितरित करायचे कारवाई ही नम्र विनंती . |
| (१४) | ५५२८ | १० | कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघातील बराचा भाग हा महानगरपालिका क्षेत्रामध्ये समाविष्ट असणे परिणामी नागरिकांना शासनाच्या विविध विभागाकडून निधी देण्यात न येणे परिणामी कोल्हापूर शहरातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रातील विकास करताना अनेक अडचणीचा सामना करावा लागत असणे तसेच अनुसूचित जाती जमाती बहुलक्षेत्राचा विकास करण्यासाठी सुद्धा निधी अभावी अनेक अडचणींना सामना करावा लागत असतो परिणामी सदर वस्तीमध्ये शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतून निधी मिळावा याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे व सामाजिक न्याय मंत्री महोदयांकडे निधीची मागणी केलेली असणे यासह अल्पसंख्याक समाजासाठी कोल्हापूर शहरातील अल्पसंख्यांक बहुल क्षेत्रात विकास कामे व सोयी सुविधा यासाठी शासनाने निधी द्यावा अशी ही मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी कोल्हापूर यांनी शासनाकडे अनेकदा केल्याचे निदर्शनास येत असणे परंतु शासनाने कोल्हापूर शहरातील अल्पसंख्याक बहुलक्षेत्रात अनुसूचित जाती जमाती वस्त्यांमध्ये विकास करण्यासाठी विशेष निधी देण्यात आलेला नाही परिणामी सदर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | समाजावर अन्याय होत असल्याची भावना समाज माध्यमांमध्ये निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे त्यामुळे शासनाने कोल्हापूर शहरातील अल्पसंख्याक व अनुसूचित जाती जमाती भागामध्ये शासनाच्या विशेष योजनेतून तातडीने निधी वितरित करावा यासाठी शासनाने कारवाई करावी ही नम्र विनंती. |
| (१५) | ५५४० | १० | कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघात कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रात नागरिकांना प्राथमिक सोयीसुविधा व इतर विकास कामे होण्यासाठी शासनाकडे सुमारे दहा कोटी 90 लक्ष रुपयाचा निधी ची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे 2022 रोजी माननीय मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य तथा नगर विकास मंत्री मंत्रालय यांच्याकडे केलेली असणे उपरोयुक्त मागणीबाबत व कोल्हापूर शहरातील विकास करण्यासाठी शासनाने निधीबाबत अद्याप कोणतीच कारवाई केलेली निदर्शनास येत नसणे परिणामी सामान्य कोल्हापूर वास यामध्ये शासनाच्या प्रती तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत असणे त्यामुळे शासनाने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मागणी केलेल्या निधीला तातडीने मंजुरी देणेबाबत कार्यवाही करावी व उपाययोजना. |
| (१६) | ५५५० | १० | कोल्हापूर शहरातील प्रमुख असलेली पंचगंगा स्मशानभूमी येथे प्राथमिक सोयीसुविधा उपलब्ध नसल्याने अंत्यविधीस आलेल्या लोकांना व मृत कुटुंबयांना अग्नी संस्कार करताना अनेक अडचणीचा सामना करावया लागत असणे पावसाळयामध्ये पावसाचे पाणी शहर मधून गळती होत असल्याने सदर ठिकाणी अंत्यविधी करण्यासाठी कुटुंब यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे त्यामुळे स्थानिक प्रशासनाने सदर स्मशानभूमीची तातडीने दुरुस्ती व नूतनीकरण करावे अशी सर्वसामान्यांची मागणी असणे यासह सदर पंचगंगा स्मशानभूमी मध्ये नागरिकांना पायाभूत सुविधा व आधुनिक यंत्रसामग्री निर्माण करण्यासाठी शासनाने विशेष निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या असणे परंतु शासनाने कोल्हापूर शहरातील पंचगंगा स्मशानभूमी याकडे केलेले दुर्लक्ष त्यामुळे शासनाने तातडीने सदर ठिकाणी विकास करण्यासाठी उपाय योजना करावे. |
| (१७) | ५५५५ | १० | कोल्हापूर शहरातील गांधी मैदानाच्या सर्वांगी विकास करण्यासाठी सुमारे 19 कोटी रुपयांचा विकास निधी मंजूर करणे बाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माननीय मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे 12 2022 रोजी केली असणे यासह कोल्हापूर शहरातील दुधाळी पॅव्हलियन तेथे कोल्हापूर शहरातील अनेक क्रीडा प्रेमी दैनंदिन खेळासाठी येत असतात त्यामुळे सदर ठिकाणी विकास करणे अत्यंत आवश्यक आहे तसेच कोल्हापूर शहरातील गांधी मैदानाच्या परिसराचा कायापालट विकास करणे खेळाडूंना क्रीडा प्रेमींना मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रलंबित असणाऱ्या सुमारे 19 कोटी रुपयांच्या आराखड्यास तातडीने मंजुरी देऊन शासनाने कोल्हापूर शहरातील गांधी मैदान व दुधाळी पॅव्हलियन या मैदानात विकास करण्यासाठी तातडीने विशेष निधी द्यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केले असणे त्यामुळे शासनाने तातडीने करावयाची कारवाई  ही नम्र विनंती. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१८) | ५५६२ | १० | कोल्हापूर शहराला ऐतिहासिक वारसा आहे यासह नाट्य व चित्रपट रंगमंच यांचा जन्म या नगरी झाल्या असल्याने सदर शहरात शाहू महाराजांच्या काळातील ऐतिहासिक उत्तम वास्तू कलाकृतीचा नमुना असणारे केशवराव भोसले नाट्यगृह यास 115 वर्षाच्या पेक्षा जास्त कालावधी झाले असणे सदर नाट्यगृहास आजतागायत विविध नाटके व विविध सांस्कृतिक कार्यक्रम नित्य नेमाने सुरू असणे तसेच सदर ठिकाणी अत्याधुनिक सोयी सुविधा करणे अत्यंत गरजेचे असून सदर ठिकाणी सर्व सोयी सुविधा युक्त प्रशस्त असे भव्य नाट्यगृह उभारावे अशी मागणी नाट्य रसिक कलावंत कलाप्रेमी यांच्याकडून अनेकदा शासनाकडे करण्यात आली असणे परिणामी शासनाने विशेष निधी देऊन ऐतिहासिक नाट्यगृहाचे संवर्धन व जोपासना करण्याची आवश्यकता असणे त्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना. |
| (१९) | ५६१९ | १० | कोल्हापूर शहरातील शाहू मिल च्या सुमारे २६.८१ जागेवर राजश्री शाहू महाराजांचे स्मारक करण्याची घोषणा तत्कालीन राज्य सरकारने केलेली असणे त्याबाबत उपाययोजना म्हणून सुमारे पाच कोटीच्या निधीची तरतुदी करण्यात आल्याने परंतु सदरची शाहू मिल परिसरातील जागा वस्त्रोद्योग महामंडळाच्या ताब्यात असून ती जागा हस्तांतरण कोल्हापूर महानगरपालिकेकडे झाले नसल्यामुळे प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत असणे तसेच सदरची जागा विनामूल्य महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यासाठी अद्याप शासनाने कोणतेही कारवाई किंवा उपाय केले नसले तसेच उपरोयुक्त शाहू मिल विकास आराखडा साठी महानगरपालिकेने सुमारे 400 कोटी चा प्रस्ताव तयार करून तो शासनाकडे सादर केल्याने असणे परंतु शासनाने शाहू स्मारक च्या आराखड्याबाबत व जागा हस्तांतरित करण्याचे प्रकरणेबाबत अद्याप कोणती कारवाई केली नसल्याने शासनाने तातडीने सदर प्रशासकीय मान्यता मिळालेल्या शाहू मिल विकास आराखड्यास तातडीने निधी वितरित करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली असणे याबाबत शासनाने तातडीने करायची कारवाई व उपायोजना करावी ही नम्र विनंती. |
| | | | **श्री. विकास ठाकरे** |
| (२०) | ५३२६ | १० | नागपूर येथील प्रसिद्ध गोरेवाडा तलाव व गोरेवाडा घाट ब्रिटिश कालीन असून हा खूप काळा पासून नागपूर च्या जनतेस उपयोगात येत असून सार्वजनिक व धार्मिक कार्या करीता लोक ज्याचा वापर करीत असून, परंतु गेले काही वर्षे झाले तलाव परिसर आणि घाट याची खूप दुरवस्था झाली आहे आणि नागरिकांची सोयी अभावावी खूप गैरसोय होत आहे त्या करिता प्रकाश वेवस्था, तसेच पूजा विधी करण्या करिता घाट बांधकाम, तलावाला पूर सवरक्षण भिंत तसेच तिथे येणाऱ्या भक्त आणि नागरिकांन करीत एक कपडे बदलायची रूम आणि स्वच्छता गृह, शुशोभीकरण व येणाऱ्या नागरिकांना मूलभूत सुविधांचा अभाव असल्या मुळे या बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२१) | ५३२७ | १० | नागपूर येथील प्रसिद्ध पोलीस लाईन टाकळी येथील प्राचीन तलाव आणि घाट हा ब्रिटिश कालीन असून हा खूप काळा पासून नागपूर च्या जनतेस उपयोगात येत असून सार्वजनिक व धार्मिक कार्या करीता लोक याचा वापर करीत असतात, परंतु गेले काही वर्षे झाले तलाव परिसर आणि घाट याची खूप दुरवस्था झाली आहे आणि नागरिकांची सोयी अभावावी खूप गैरसोय होत आहे त्या करिता प्रकाश वेवस्था तसेच पूजा विधी करण्या करिता घाट बांधकाम, तसेच तिथे येणाऱ्या भक्त आणि नागरिकांन करीत एक कपडे बदलायची रूम आणि स्वच्छता गृह, शुशोभीकरण आणि तलाव परिसरात मार्गक्रमण करण्या करता सिमेंट रस्ते करणे व येणाऱ्या नागरिकांना मूलभूत सुविधांचा अभाव असल्या मुळे या बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (२२) | ५३२८ | १० | नागपूर येथील मानकापूर चौक येथे पागलखाना हॉस्पिटल परिसरात संत श्री बाबा ताजुद्दीन यांचा प्राचीन काळातील दर्गा असून या दर्ग्यामध्ये संत ताजुद्दिन बाबा यांची बैठक होत होती या कारणाने अद्यावत असलेल्या दर्गा परिसरात हजारो भक्तांची दैनंदिन येजा असते तसेच येथे लोक मोठ्या प्रमाणात प्रार्थना करत असतात तसेच येथे दररोज भोजनदान केले जाते परंतु शासनाची आकडे दुर्लक्ष असल्यामुळे येथे येणारे हजारो भाविकांची गैरसोय होत असते येथे भाविकांना विसावा घेण्याकरिता एक एका प्रार्थना सभागृहाची आवश्यकता आहे आवश्यकता तसेच परिसरातील विविध विकास कामे करण्याची ही आवश्यकता आहे या बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना |
| (२३) | ५६३८ | १० | पुणे महानगरपालिका हद्दीतील जांभुळवाडी तलावामध्ये दुषित - दुर्गंधीत पाणी सोडले जात असल्याबाबत. माझ्या कार्यक्षेत्रातील मौजे-जांभुळवाडी येथील जांभुळवाडी तलावामध्ये दुषित-दुर्गंधीत पाणी सोडल्याने येथील जैवविविधेस धोका निर्माण झालेले असून या पाण्यामुळे येथील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. |
| (२४) | ५७११ | १० | भिवंडी महानगरपालिकेतील शिवाजी चौक येथील सन १९९१ रस्तारुंदीकरणमध्ये तोडलेल्या गाळयांचे महानगरपालिकेची जमिन भिवंडी सर्व्हे क्रं. १०२ व सर्व्हे क्र. ७३ मध्ये ३४ गाळयांचे सन १९९१ च्या नगरपालिका महासभेच्या कायदेशीर ठरावानुसार पुनर्वसन करण्यात आले. लगतचे सर्व्हे क्रं. १०१ मध्ये टोलेजंग ईमारत बांधण्यासाठी विकासकाला अडथळा निर्माण होऊ नये म्हणुन महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी विकासकास रेड कारपेट अंथरुन करुन दिलेले असुन त्यामुळे येथील ३४ गाळयांना बांधकाम तोडावयाची नोटीस न देता परस्पर गाळेधारकांचे बांधकाम निष्कासीत करुन गाळेधारकांना देशोधडीला लावलेले आहे, गेल्या ३ वर्षांपासुन बेरोजगार बनवुन उपासमारीची वेळ आणलेली आहे आता त्यापैकी १४ गाळेधारकांनी सव्र्व्हे क्रं. १०२ व सर्व्हे क्र. ७३ मध्ये जागा उपलब्ध करुन दिले असुन जमिनधारक शिवकुमार गुप्ता यांची गेल्या ३२ वर्षापासुन गाळेधारकांच्याविरुध्द कुठलीही हरकत नसल्यामुळे गाळेधारक हे गेले ३२ वर्षापासून सर्व्हे क्र. ७३ मध्ये दिवाणी न्यायाच्या कायद्याने ॲडव्हर्स पजेशनने कब्जेदार आहेत तसेच भिवंडीत एकही टॅक्सि परमिट नसुन आरक्षण जागेत कुठल्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | विकासकाच्या फायद्यासाठी महानगरपालिकेच्या खर्चाने वाहनतळ बांधुन देण्यात येत आहे याची उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे विकास आरखड्याप्रमाणे महापालिकेच्या डिपी रोडमध्ये कुंपण व वाहनतळ बनवण्यात येत आहे तर गाळ्यांची जागा असलेले रहिवासी जागेमध्ये जाणुनबुजून रस्ता बनवण्यात आलेला आहे हा सर्व खटाटोप महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी एका धनदांडग्या राजकीय पुढाऱ्यासाठी गैरव्यवहारातुन गैरलाभ मिळवण्याच्या दृष्टीकोनातून करण्यात आलेला आहे सदर सर्व्हे क्र. १०२ व ७३ ही जागा रिक्त असलेल्या मोकळी जागेचे छायाचित्रणासह दि. १७/११/२०२२ व दि. २४/२/२०२३ रोजी प्रधानसचिव नगरविकास विभाग व भिवंडी महापालिका यांना निवेदन दिलेले असुन भिवंडी महापालिकेने मागील अधिवेशनात विकासकाच्या फायदयासाठी जाणुनबुजून चुकीचे उत्तर दिले असल्यामुळे व सदर गाळेधारकांची मोक्याची जागा हडपुन विकासकास रेड कारपेट अंथरून दिलेले आहे त्यामुळे गोर गरीबांचे व बेरोजगारांचे असलेल्या शासनाने या भ्रष्ट अधिकाऱ्यांचे कानउघडणी करुन राहिलेल्या मोकळया जागेत देशोधडीला व उपासमारीस आलेल्या या १४ गाळेधारकांना त्याच ठिकाणच्या रिक्त असलेल्या जागेवर पुनर्वसन करून देण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाने करावयाची कार्रवाई शासनाची प्रतिक्रिया व शासनाची भुमिका. |
| (२५) | ५७१७ | १० | समाधान सह संस्था, सुभाष खेमकर मार्ग, दादा पश्चिम मुंबई २८ येथील विकासक रेर्नसन कंस्ट्रक्शन यांनी झो.पु.प्रा. परिपत्रक क्रमांक ५३ चा लाभ सुट घेऊन प्रकल्पग्रस्त सदनिका महापालिकेस उपलब्ध न करता विकासक यांनी सदर मालमत्तेमध्ये महापालिकेचे ३० करोड रुपयांचे अतिरिक्त विकास क्षेत्र व ३० करोड प्रकल्प ग्रस्त सदनिका गिळकृत केले, तसेच सदर योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात झो.पु. प्रा. शासकीय व मुंबई महानगरपालिका अधिकारी वर्गाने सदर विकासकाच्या ६० करोडच्या आर्थिक फायदयाकरीता मोठ्या प्रमाणात अनियमितता केल्याबाबत दि. १/११/२०२२ रोजी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना योगेश खेमकर यांनी तक्रार दिली होती परंतू मुंबई महापालिका व झो.पु.प्रा. यांनी वेळोवेळी अर्जदाराच्या तक्राराला बगल देऊन व शासनाला खोटा अहवाल सादर करुन अप्रत्यक्षरीत्या गैरव्यवहारातुन विकासकास अनियमितता व अंगुणवत्तेच्या आधारावर मदत करून विकासकास करोडो रुपयांचा फायदा करुन दिला आहे त्यामुळे विकासकासह संबंधित जबाबदार शासकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या अनागोंदी कारभाराबाबत शासनाचे झालेले अतोनात नुकसान व फसवणुकीसाठी विकासकाकडुन करोडोंचा महसूल वसुल करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक खाते व गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्याकडून सखोल चौकशी होण्याकरीता शासन स्तरावरती ठोस कारवाई करण्याची आवश्यकता असल्याने शासनाने गांभिर्याने दखल घेऊन कडक ती कडक करावयाची कारवाई. |
| (२६) | ५७२० | १० | नगरभूमापन अधिकारी ठाणे येथील पाचपाखाडी सर्व्हे नं. २२९/१७ टि. पी. नं. ९ नगरभूमापन क्र. ३८७ च्या जमिन मिळकतीत सातबाऱ्यावरील नोंदीप्रमाणे व टि. पी. स्कीम मधील सुधारणेप्रमाणे मुळ खातेदार मधुकर गणपत कोडालकर यांचे नाव |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मिळकतपत्रीकेवर न आल्याने व गणपत आनंदा कोंडाळकर आजोबा हे मयत असल्याने वारस चित्रा हरिचंद्र जाधव यांचे नाव मिळकतपत्रीकेवरती नोंदवणेसाठी व मधुकर गणपत कोंडाळकर त्यांचे नाव टि.पी. स्किमप्रमाणे राहुन गेल्याने जुने सातबारा पाहता टि.पी. स्किमप्रमाणे मधुकर गणपत कोंडाळकर यांचे नाव मिळकत पत्रिकेवरती नोंदविण्याचे राहून गेले त्याची दुरुस्ती म्हणून महाराष्ट्र शासन प्रधानसचिव नगरविकास विभाग यांच्याकडे दि. ४/२/२०२१ रोजी चित्रा हरीश्चंद्र जाधव यांनी निवेदन सादर केले होते परंतू सदर निवेदनाबाबत कुठलीही कार्यवाही न झाल्याने शासनाने मधुकर गणपत कोंडाळकर यांचे हक्क अधिकार त्यांची मुलगी चित्रा हरिश्चंद्र जाधव यांनी मिळण्यासाठी शासनाने तुर्त करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (२७) | ५६७३ | १० | नगरपरिषदांना वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजना/ ठोक तरतुद / रस्ते अनुदान योजनेसह इतर योजनेमधून नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी अमरावती जिल्हयातील तिवसा नगरपपंचायत येथे शहराच्या विविध विकासकामांना 1 एप्रिल 2021 पासून तर जुलै 2022 पर्यत निधीसह प्रशासकीय मान्यता देऊन त्या प्रमाणे आदेश निर्गमित केलेले आहे. या कामांना प्रत्याक्षात सुरवात होणार असतानांच नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी माहे जुलै 2022 रोजी परिपत्रक काढून 1 एप्रिल 2021 पासून तर आतापर्यंत मंजूर झालेल्या/निविदा प्रक्रिया न झालेल्या/निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन वर्क आर्डर न दिलेल्या/वर्क आर्डर देऊन काम न सुरू केलेल्या अशा सर्व कामांना कोणतेही ठोस कारण न दर्शविता स्थगिती दिलेली आहे.त्यामूळे यांनी अमरावती जिल्हयातील तिवसा नगरपपंचायत येथील मंजूर असलेली सर्व विकासकामे ठप्प झाल्यामूळे अनेक समस्या निर्माण झाले असून नागरिकांना माणसिक व आर्थिक त्रास सहण करावा लागत आहे. त्यामुळे नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांनी राज्यातील अनेक नगरपरिषद विकास कामावर दिलेली स्थगिती उठविलेली असल्याने त्याच धर्तीवर यांनी अमरावती जिल्हयातील तिवसा नगरपपंचायत मधील विकासकामांना दिलेली स्थगिती उठवुन विकासकामे पुवर्वत सुरू करण्यासाठी पर्याप्त निधी उपलब्ध करुन देणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. चेतन तुपे** |
| (२८) | ५५६५ | १० | पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या विशेषतः हडपसर विधानसभा मतदारसंघातील मांजरी साडे सतरा नळी केशवनगर कोंढवा इत्यादी गावांमधील विकास कामांसाठी पुरेसा विकास निधी उपलब्ध नसल्यामुळे खुळमलेले विकास कामे परिणामी नागरिकांची होत असलेली गैरसोय पुरेसा विकास निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२९) | ५५८२ | १० | पुणे शहरातील स्वारगेट-कात्रज मेट्रो प्रकल्पाचे अत्यंत मंद गतीने सुरू असलेले काम,परिणामी होत असलेली वाहतूक कोंडी, हा टप्पा तातडीने पूर्णत्वास नेऊन पुढे स्वारगेट ते हडपसर-लोणी काळभोर या प्रस्तावित टप्प्याचे काम तातडीने सुरू करण्याची |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आवश्यकता,मात्र या टप्प्याच्या कामाचा अद्याप डीपीआर ही तयार नसणे,ह्या संपूर्ण प्रकल्पाला तातडीने मंजुरी मिळून काम पूर्णत्वास नेण्याची आवश्यकता, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३०) | ५५८५ | १० | पुणे शहरातील नागरिकांना तीव्रतेने भेडसावीत असणारी डुकरे,कुत्री आणि तत्सम भटक्या प्राण्यांच्या उपद्रवाची समस्या,ह्या प्राण्यांनी नागरिकांवर विशेषतः महिला आणि शाळकरी मुलांवर वारंवार हल्ले करण्याचे घडत असलेले प्रकार,त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे असुरक्षिततेचे आणि असंतोषाचे वातावरण,भटक्या प्राण्यांच्या उपद्रवाचा तातडीने बंदोबस्त करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची आवश्यकता,शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष. |
| (३१) | ५५८७ | १० | पुणे शहराची अफाट वेगाने होणारी वाढ,सातत्याने लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात पडणारी भर, राज्यातील सर्वाधिक जास्त वाढीचे शहर अशा प्रकारची पुण्याची नोंद असणे,वाढत्या लोकसंख्येला पुरेसे पिण्याचे पाणी पुरवण्याचे कामी महानगरपालिका यंत्रणेवर येत असलेला ताण, परिणामी बऱ्याच ठिकाणी अनियमित आणि अपुऱ्या दाबाने पाणी पुरवठा होणे इत्यादी प्रकारांनी नागरिकांची होणारी गैरसोय,पुणे शहरालगतच्या धरणांमधून समुद्राकडे वाहून वाया जाणारे पाणी पुण्याकडे वळवून पुणे शहरासाठी जादा पाच टीएमसी पाणी उपलब्ध करण्याची आवश्यकता,त्यासाठी तातडीने करावयाची उपाययोजना, पुणे महानगरपालिकेकडून या बाबींचा पाठपुरावा सातत्याने करून ही समस्या प्राधान्याने सोडवण्याची आवश्यकता,शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष. |
| (३२) | ५६२६ | १०० | मुलुंड (पश्चिम) येथील ॲटमॉसपियर रियालिटी येथील मुलुंड - गोरेगाव लिंक रोड येथे असलेले कचऱ्याचे साम्राज्य त्यामुळे तेथील नागरीकांना होणारा त्रास तसेच आरोग्याच्या समस्या ही वाढत आहे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. धिरज देशमुख** |
| (३३) | ५३५१ | १० | रेणापूर नगर पंचायत जि.लातूर येथील प्रभाग क्र.१३ प्रभू हरिचंद्र चव्हाण यांचे घरापासून ते हरिलाल राठोड यांचे घरापर्यंत सिमेंट रोड करणे आवश्यक असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३४) | ५३५३ | १० | रेणापूर नगर पंचायत जि.लातूर येथील प्रभाग क्र.१३ मोतीराम हरिसिंग राठोड यांचे घरपासून ते रामचंद्र चव्हाण यांचे घरापर्यंत सिमेंट रोड करणे आवश्यक असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३५) | ५३५५ | १० | रेणापूर नगर पंचायत जि.लातूर येथील प्रभाग क्र.११ प्रकाश पुजारी यांचे घर ते ज्ञानोबा आरदवाड यांचे घरपर्यंत सिमेंट रोड व नाली करणे आवश्यक असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (३६) | ५३५७ | १० | रेणापूर नगर पंचायत जि.लातूर येथील नगरपंचायत रेणापूर ते बसवेश्वर चौक सिमेंट रस्ता व नाली करणे आवश्यक असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३७) | ५३५८ | १० | रेणापूर नगर पंचायत जि.लातूर येथील किशोर सोमाणी यांचे घर ते ईदगाह मैदान सिमेंट रस्ता करणे आवश्यक असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३८) | ५३५९ | १० | रेणापूर नगर पंचायत जि.लातूर येथील जीवन पाटील यांचे घर ते मल्लीकार्जून बनाळे यांचे घरा पर्यंत सिमेंट रस्ता करणे आवश्यक असणे. सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता व करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. शेखर निकम** |
| (३९) | ५६३६ | १०० | चिपळूण शहराचा प्रस्तावित विकास आराखडा DP आणि वगळलेला भाग EP बाबत अद्याप शासन निर्णय झालेला नाही. त्यामुळे कायदेशीर पध्दतीने व रितसर परवानग्या घेऊन सुरु असलेल्या व पूर्ण झालेल्या इमारतीची कामे गेली 4 वर्षे रखडलेली आहेत. त्यामुळे चिपळूण शहराचा प्रलंबित असलेला विकास आराखडयांसदर्भात अंतिम निर्णय तातडीने व्हावा तसेच चिपळूण नगरपरिषद व परिसरातील ग्रामपंचायत क्षेत्रातील निळी रेषा व लाल पूररेषा आखण्याचे काम कोणताही ठोस सर्व्हे न करीता आणि संयुक्तीक कारणे विचारात न घेता केले आहे. त्यामुळे नगरपरिषदेकडून बांधकाम परवानगीस निर्बंध लावण्यात आले आहेत. म्हणून चिपळूण नगरपरिषद व परिसरातील ग्रामपंचायत क्षेत्रातील पूररेषा आखण्याबाबत फेर सर्व्हे घेण्यात यावा. |
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (४०) | ५५३८ | १० | मुंबई शहर व उपनगर येथे झोपडपट्ट्यांचे प्रमाण वाढत असणे, सरकारी व वन जमिनींवर अतिक्रमण होत असणे, या जमिनीवर अनधिकृत झोपडया बांधण्यात येणे, अनधिकृत वीज व पाणी जोडणी करीत नियमबाहय पध्द्यतीने सदर झोपडया भाडयाने देण्यात येणे, भूमाफिया आणि शासकीय कर्मचारी व अधिकारी यांच्या संगनमताने अतिक्रमणावर कारवाई होण्यास विलंब होत असणे, मुंबईची अवस्था बकाल होणे यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (४१) | ५६६३ | १० | ''महाराष्ट्र राज्य हे एक पुरोगामी आणि देशात नावलौकिक मिळविलेले राज्य असणे. केंद्र शासनाच्या अनेक योजना राबवत असतांनी आपल्या राज्याने कायम अग्रेसर पणा दाखविणे. प्रधानमंत्री आवास योजना ही अशीच एक महत्वाकांक्षी योजना असून राज्यात ती अग्रेसरपणाने राबविली जात असणे. असे असले तरी राज्यातील ग्रामीण भागात आणि विशेषत: आदिवासी भागातील नगरपरिषदा आणि ग्रामपंचायतीमध्ये ही योजना राबवत असतांनी शासकीय जागा उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने अनेक अडचणींचा सामना करावा लागणे. ग्रामीण भागात खूप कमी लाभार्थी यांच्याकडे स्वत:ची जागा उपलब्ध असणे. साहजिकच पात्रता आणि आवश्यकता असूनही जागेची |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | उपलब्धता न झाल्यामुळे असे लाभार्थी घरकुल योजनेपासून वंचित राहणे. आज ग्रामीण भागात अत्यल्प अशा शासकीय जागा उपलब्ध असल्याने घरकुल बांधून देत असतांना G+2 किंवा G+3 बांधकाम करणे आवश्यक असणे, तसेच आवश्यक त्या ठिकाणी अनुषंगिक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असणे. याबाबत सातारा जिल्ह्यातील रहीमतपूर नगरपालिकेने ४८ लाभार्थीसाठी G+2 असा पथदर्शी घरकुल प्रकल्प राबवणे. तसेच शासकीय जागा उपलब्ध नसल्यास गावठाण विस्तारसाठी खाजगी जागा संपादन करण्याच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करून देणे आवश्यक असणे. सबब उपरोक्त सर्व वस्तूस्थिती लक्षात घेता राज्यातील नगरपरिषदा व ग्रामीण भागात घरकुल योजना राबविण्यासाठी राज्य शासनाने घरकुल बांधकाम व अनुषंगिक पायाभूत सुविधा यासाठी शासकीय जागा प्राधान्याने उपलब्ध करून देणे आणि G+2 किंवा G+3 बांधकाम करण्याच्या अनुषंगाने सर्वसमावेक्षक सूचना निर्गमित करणे याबाबतची शासनाची भूमिका आणि करावयाची कार्यवाही.” |
| (४२) | ५६६५ | १० | पिंपरी चिंचवड शहरासाठी सुरळीत पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने भामा आसखेड धरणातून शहराला पाणीपुरवठा करणे प्रस्तावित असणे, यासाठी भामा आसखेड धरणामध्ये जॅकवेल बांधणे प्रस्तावित असणे , या पाणी उचलण्यासाठीच्या जॅकवेलसाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने सुमारे 121 कोटी रूपयांची निविदा काढणे, सुरूवातीला अवघ्या दोनच निविदा आल्याने निविदांसाठी तीन वेळा मुदतवाढ दिली जाणे,त्यानंतरही त्याच दोन ठेकेदाराने निविदा भरणे,एक निविदा गोंडवाना कनट्रक्सशन कंपनी आणि टी अँड टी या भागीदार कंपनीची तर दुसरी निविदा श्रीहरी असोसिएटस अँड ए.बी.एम या भागीदार कंपनीची असणे,अनुभवाची अट पुर्ण करत नसल्याने श्रीहरी असोसिएटस अँड ए.बी.एम कंपनीस अपात्र ठरविण्यात येणे व गोंडवाना कनट्रक्सशन कंपनी आणि टी अँड टी या भागीदार कंपनीची निविदा ग्राहय धरण्यात येणे,ही निविदा 39 टक्के जादा दराची म्हणजे तब्बल 168 कोटी रूपयांची असणे ,त्यानंतर ठेकेदाराने ही निविदा 151 कोटी म्हणजेच मुळ निविदेच्या 30 कोटी रूपये जादा दराने अंतिम करणे, एका रात्रीत संबधित ठेकेदार निविदेची रक्कम 17 कोटीने कमी करून 151 कोटी वर अंतिम करणे ,या मागे आर्थिक गैरव्यवहार झालेला असणे, तद नंतरही 121 कोटी मुळ किंमतीच्या निविदेच्या कामाला 151 कोटी रूपये खर्च होत असलयाने पिंपरी-चिंचवडकरांचे 30 कोटी रूपयांचे आर्थिक नुकसान होत असणे,एंकदरीतच सदर प्रकरणी 47 कोटी रुपये आर्थिक गैरव्यवहार होत असल्याने ही निविदा प्रकियाच रद्द करून नव्याने निविदा प्रक्रिया घेण्याची स्थानिक लोक प्रतिनिधी व नागरिकांची मागणी होत असणे,या विषयी शासनाने करवायाची कार्यवाही व शासनाची भूमिका. |
| (४३) | ५६६७ | १० | ”मीरा-भाईंदरच्या सीआरझेड भागात मोठ्या प्रमाणात कांदळवनाची कत्तल करण्यात येत असल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, एवढेच नव्हे तर या भागातील कांदळवाणाची कत्तल करून, नैसर्गिक प्रवाह रोखून, प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी न घेता पंचतारांकित क्लब उभारण्यात आला असल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, पर्यावरणाची हानी होत असल्याने सदर प्रकरणाची राष्ट्रीय हरित लवादाने गंभीर दखल |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | घेतलेली असणे, मिरा भाईंदर येथील "सेवन इलेव्हन क्लब" या इमारतीचे बांधकाम केले असणे, सदरहू बांधकाम महामार्गालगत नसताना आणि ना विकास क्षेत्रात असताना राज्य सरकारच्या नगरविकास विभागाने 13 एप्रिल 2018 रोजी च्या आदेशाने बांधकामाला दिलेली परवानगी बेकायदा असल्याचे उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात स्पष्ट केले असणे, तेथे झालेले बांधकाम तोडण्याचे आदेश न्यायालयाने दिलेले असतानाही अद्याप बांधकाम तोडलेले नसणे, नवघर गावातील ज्या भूखंडावर सेवन इलेव्हन हॉटेल्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने फोर स्टार श्रेणीतील चार मजली इमारत उभारली आहे ती जागा ना विकास क्षेत्रात असताना बांधकामाबाबत अनेक बंधने असताना कंपनीने त्या ठिकाणी विकास करण्यासाठी अर्ज केल्यानंतर महानगरपालिकेने देखील नियमाच्या विरुद्ध जाऊन बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येणे, या सगळ्या प्रकरणाची चौकशी करण्याबाबत होत असलेली मागणी, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (४४) | ५६७० | १० | शासनाकडून दक्षिण मुंबईतील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असणाऱ्या महालक्ष्मी रेस कोर्स ची जागा बिल्डरच्या घशात घालण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, रेस कोर्स मैदानाचा भूखंड रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब ला 99 वर्षाच्या लीज मुदतीवर देण्यात आलेला असताना, या भूखंडाचा भाडेपट्टा करार 2013 मध्ये संपलेला असताना, रेस कोर्स वरील एकूण आठ लाख 55 हजार 198 चौरस मीटर जागेपैकी दोन लाख 58 हजार 2245 चौरस मीटर ची जागा महापालीकेच्या मालकीची व पाच लाख 96 हजार 953 चौरस मीटरची जागा राज्य सरकारच्या मालकीची असताना आतापर्यंत शासन आणि महानगरपालिकेला क्लब कडून वाढीव भाडे आणि जमिनीचा ताबा परत घेता आलेला नसणे, राज्य शासनाने तात्कालीन मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून तेथे हाइड पार्कच्या धर्तीवर कोणतेही बांधकाम नसलेले भव्य उद्यान विकसित करण्याचे प्रस्तावित असताना विद्यमान सरकारने सदर जागा बिल्डरांच्या फायद्यासाठी देऊन मुंबईकरांच्या हक्काची मोकळी जागा नष्ट करून या ठिकाणी सिमेंटचे जंगल उभारण्याचे ठरविलेले असणे, महालक्ष्मी येथील रेस कोर्स मुलुंड येथे हलवून महालक्ष्मी येथे थीम पार्क बांधण्याच्या योजना पालिका प्रशासक आणि राज्य सरकारच्या माध्यमातून सुरू असणे, यामुळे मुंबईकरांच्या हक्काची व मुंबईचे फुफुस समजले जाणाऱ्या रेसकोर्सची मोकळी जागा विकासकाला देण्यात येत असल्यामुळे सर्वसामान्य मुंबईकरांच्या मनामध्ये राज्य शासनाच्या विषयी पसरलेला प्रचंड संताप, मुंबईकरांच्या हक्काची विनामूल्य जागा बिल्डर आणि व्यवसायिकांना देण्याचा डाव हाणून पाडण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, वरळी डेअरी ची जागा ज्याप्रमाणे बिल्डरच्या घशात घालण्याची राज्य शासनाने तयारी केली त्याप्रमाणे येथील जागा देखील बिल्डरला देण्यात येऊ नये अशी होत असलेली मागणी, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (४५) | ५६७६ | १० | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री आवास योजनेत गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच उघडकीस येणे, अशा प्रकारचा गैरव्यवहार उघडकीस आल्यामुळे सदरहू प्रकल्प राज्य शासनाने रद्द केलेला असणे, प्रकल्प रद्द झाल्यामुळे नवीन निविदा काढण्याबाबत अद्याप शासनाने कोणताही कार्यवाही केलेली नसणे, तसेच गैरव्यवहार झालेल्या योजनेची चौकशी केली असता सदरहू प्रकल्प प्रस्तावित जागेवर करणे शक्य नसल्याचा अहवाल चौकशी समितीला दिलेला असणे, सदर प्रकल्पात सुमारे 40,000 सदनिका बांधणे प्रस्तावित असता निविदा धारकांची आर्थिक क्षमता आणि प्रत्यक्षात किती सदनिका निर्माण होऊ शकतात याचा अभ्यास केला असता दोन्ही बाबी नकारात्मक असल्याचे स्पष्ट होणे, तसेच नियमबाह्य निविदा काढल्या गेल्याचा ठपका ठेवण्यात आलेला असणे, या संपूर्ण प्रकारात सुमारे एक हजार कोटी रुपयांचा घोटाळा झालेला असण्याची शक्यता, एकूण सात भूखंडावर आणि सहा प्रकल्पांतर्गत चाळीस हजार सदनिका बांधण्यासाठी निविदा काढली असता प्रत्यक्षात सदर प्रकल्प केवळ एका भूखंडावर 7000 सदनिकांसाठी सुरू केलेला असणे, या प्रकल्पांतर्गत सदनिका धारकांना तीनशे दहा चौरस फुटांचे घर 14 लाख रुपयांमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार असणे, परंतु जास्तीत जास्त घरे निर्माण करता यावीत असा हट्ट प्रशासनाकडून धरण्यात आल्यामुळे घरांची संख्या आणि भूखंडाची जागा वाढविण्यात आल्यामुळे या जागेवर एवढी घरे निर्माण होणे शक्य नसताना केवळ प्रशासनाच्या गैर कारभारामुळे ही योजना रद्द झाल्यामुळे शहरातील बेघर गरीब, मोलमजुरी करणाऱ्या कामगार वर्गाला निवासाची मूलभूत गरज पूर्ण करता येत नसल्यामुळे शासनाच्या बद्दल पसरलेली संतापाची लाट, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (४६) | ५६७९ | १० | शासनाच्या उच्च पदस्थांनी मुंबईतील मेट्रो प्रकल्पग्रस्तांच्या घर वाटपात 1000 कोटी रुपयांचा घोटाळा केल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीला येणे, मेट्रो प्रकल्पग्रस्तांना देण्यात आलेल्या दोन हजार घरांमध्ये असा घोटाळा झालेला असणे, सदर प्रकरणात खोटे लाभार्थी, खोटे सर्वेक्षण, एकाच व्यक्तीला चार ते पाच घरे असे गंभीर प्रकार घडले असणे, या सर्व गोष्टी माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत प्राप्त झालेली असणे, मुंबईमधील पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये एम एम आर डी ए कडून आतापर्यंत सुमारे 65 हजार प्रकल्पग्रस्तांना पर्यायी घरांचे वाटप करण्यात आलेले असणे, विशेषतः सन 2014 पासून मोठ्या प्रमाणावर घोटाळा सुरू असणे, या संदर्भातील प्रचंड मोठ्या प्रमाणात तक्रारी उपमुख्यमंत्र्यांकडे केल्या असता त्या संदर्भात कोणतीही कार्यवाही केली जात नसल्यामुळे आणि राज्याचे गृहमंत्री अशा प्रकारच्या कोणत्याही घोटाळ्यांना तातडीने क्लीन चीट देत असल्यामुळे घोटाळेबाजांचे वाढलेले धारिष्ट, उदाहरणार्थ सन 2019 मध्ये ‘मेट्रो-6’ प्रकल्पाच्या जमिनीसाठी सर्वेक्षण करण्यात आले असता 272 वास्तूंच्या सर्वेक्षणात केवळ 178 घरे पात्र घोषित करण्यात आले असता एम एम आर डी ए कडून आणखीन 135 बोगस प्रकरणांना मान्यता देण्यात येणे, या सर्वांमध्ये उपजिल्हाधिकारी रचना आणि सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांचा समावेश असणे, परिणामी यासंदर्भातील कोणत्याही तक्रारींचे निवारण सरकारकडून होत |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नसल्यामुळे खऱ्या प्रकल्पग्रस्त बाधितांमध्ये शासनाविषयी पसरलेली नाराजीची भावना, या संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (४७) | ५६८२ | १० | मुंबई महानगरपालिकेच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेला 'कोस्टल रोडच्या' प्रकल्पाचे कामकाज मुंबईतील टँकर चालकांच्या संपामुळे बाधित झाले असल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस येणे, टँकर चालक-मालकांच्या संपामुळे मुंबई शहरातील मोठे मोठे प्रकल्प मेट्रो रेल्वे, कोस्टल रोड इत्यादी प्रकल्पांचा पाणीपुरवठा बंद झालेला असणे, मुंबई पोलीस आयुक्तांनी परिपत्रक जारी करून बोरवेल, ट्यूब वेल्स, विहिरीतून अनधिकृतपणे पाण्याचा उपसा करण्यावर बंदी घातलेली असणे, सक्षम प्राधिकरणाने दिलेल्या परवानगीपेक्षा जास्त पाण्याचा उपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा दिलेला असणे, अशा प्रकारच्या खरमरीत परिपत्रकाच्या विरोधात मुंबईतील टँकर चालक-मालक संपावर गेलेले असणे, या संघटनेच्या म्हणण्यानुसार शहरात सुमारे दीड ते दोन हजार टँकर विविध सरकारी प्रकल्पांना, इमारत बांधकामांना तसेच विविध जिमखानांच्या हिरवळीसाठी पाणीपुरवठा करीत असणे, ज्या कामासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर होत नाही अशा कामांसाठी जल पुनर्भरणाच्या माध्यमातून पाणी मारले जात असणे, पाणीपुरवठा ही महानगरपालिकेची जबाबदारी असताना महानगरपालिका पोलिसांनी परिपत्रक काढले असल्याचे सांगून आपली जबाबदारी झटकत असणे, परिणामी मुंबईतील प्रकल्प रखडल्यामुळे शहरातील नागरिकांमध्ये राज्य शासनाविषयी पसरलेली अप्रीतीची भावना, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (४८) | ५६८५ | १० | मीरा-भाईंदर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती नाजूक झाल्यामुळे विकास कामांची कोट्यवधी रुपयांची देयके देण्यासाठी महापालिकेने मुदत ठेव मोडली असल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीला आलेली असणे, मीरा-भाईंदर महापालिकेची आर्थिक स्थिती नाजूक झाल्यामुळे विकास कामांची देयके मोठ्या प्रमाणावर थकलेली असणे, मागील वर्षी देखील थकीत रकमा देण्यासाठी महासभेने बँकेतून ओव्हरड्राफ्ट घेण्यास मान्यता दिलेली असणे, शेकडो कोटींच्या देयकांसाठी कंत्राटदारांकडून महापालिकेकडे तगादा लावण्यात येत असणे, परिणामी शहरातील विकास कामांवर होत असलेला परिणाम, विकास कामे रखडल्यामुळे किंवा अर्धवट असल्यामुळे नागरिकांना होत असलेला त्रास, हाल अपेष्टा, परिणामी महानगरपालिका अंतर्गत रहिवाशांमध्ये मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेली नाराजीची भावना, त्यामुळे महानगरपालिका प्रशासनाला आपल्या मुदत ठेवी मोडीत काढण्याची येत असलेली वेळ, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेली संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (४९) | ५६८७ | १० | नवी मुंबई मधील भूमिपुत्रांनी गरजेपोटी बांधलेली घरे भाडेपट्ट्यावर नियमित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असला तरी त्याची अद्याप अंमलबजावणी झाली नसल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस येणे, सिडको प्रशासनाने भाडेपत्याची रक्कम भरण्यासाठी आवाहन करूनही आणि 31 मार्च 2023 पर्यंत मुदतवाढ देऊनही |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | त्याला भूमिपुत्रांनी प्रतिसाद दिलेला नसणे, तथापि भूमिपुत्रांनी गरजे पोटी बांधलेली घरे ही सिडको आणि महापालिकेकडून सरसकट बेकायदार ठरली जात असणे, त्यामुळे हक्काची घरे नियमित व्हावी यासाठी प्रकल्पग्रस्तांचा संघर्ष अनेक वर्षापासून सुरू असणे, 25 फेब्रुवारी 2022 पर्यंतची सर्व घरे नियमित केली जाणार असल्याचा राज्य शासनाने निर्णय करून विस्तारित गावठाणांची हद्द २०० मीटर वरून २५० मीटर पर्यंत वाढविलेले असणे, भूमिपुत्रांनी भाडेपट्ट्यावर घरे कायम न करता मालकी हक्काने कायम करावी अशी मागणी केलेली असणे, मात्र याकडे राज्य शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी नवी मुंबईच्या विकासासाठी आपल्या जमिनी अर्पण करणाऱ्या भूमिपुत्रांच्या मूलभूत हक्कांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे त्यांच्या मनात शासनाविषयी पसरलेली संतापाची लाट, याबाबतीत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| | | | **ॲड. अशोक पवार** |
| (५०) | ५५५८ | १० | शिरूर शहर (जि.पुणे ) पाणी पुरवठा योजना सन १९८५ मध्ये कार्यान्वित असून त्यावेळी शिरूर शहराची लोकसंख्या साधारण १०००० इतकी असणे, सन २०११ लोकसंख्या जनगणनेनुसार ३७११९ इतकी असणे, परंतू आज स्थितीत साधारणतः ५५००० इतकी लोकसंख्या असणे, अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनेची क्षमता ही अपुरी असून शहराच्या सद्यस्थितीतील मागणी पेक्षा कमी असणे, तसेच अस्तित्वातील पाण्याचा स्रोत शाश्वत (बारमाही) नसणे, अस्तित्वातील योजना ही पावसाळा वगळता डिंभे धरणातून सोडण्यात येणाऱ्या आवर्तनावर अवलंबून असणे, तसेच नदीमार्गे सोडण्यात येणाऱ्या आवर्तनामुळे काही काळ स्त्रोतातील पाणी दूषित असते व त्यामुळे नागरिकांमध्ये आरोग्य विषयक समस्या मोठ्या प्रमाणावर उद्भवणे, त्याकरिता नगरपरिषदे मार्फत योजनेसाठी सर्वेक्षण करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेत आला असणे, सदर योजना घोड धरणाच्या उद्भवातून आखण्यात येऊन सविस्तर प्रकल्प अहवालास मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग पुणे यांचेकडील जा. क्र. मु. अ. ( पुणे )/तांशा-2 / शिरूर पापुयो / 1194 दि. 16/07/2021 अन्वये तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली असणे, तसेच जलसंपदाविभाग पुणे मार्फत दि. 16/11/2021 रोजी 2.291 दलघमी इतके पाणी आरक्षण सदर योजनेस मंजुर करण्यात आले असणे, महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजने अंतर्गत वाढीव पुरवठा योजनेच्या रुपये 55,92,54,231/- रकमेस प्रशासकीय मान्यता मिळणे करिता दि. शिरूर पाणी 06/08/2021 रोजी मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडे नगरपरिषदेमार्फत प्रस्ताव सादर करणेत आला असणे तरी शिरूर नगरपरिषदेच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेस प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेस शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे याबाबत शासनाने करवायाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. दिलीपराव बनकर** |
| (५१) | ५५२२ | १०० | ओझर मिग, ता.निफाड, जि.नाशिक या शहरासाठी सन १९९४-९५ साली नळपाणीपुरवठा योजना सुरु झालेली असणे. सदर योजनेस २६ वर्ष पूर्ण झालेले असून आजरोजी पिण्याच्या पाण्याची मोठी अडचण निर्माण झालेली असल्याने या शहरास ४ ते ५ दिवसाआड पाणीपुरवठा करावा लागतो हे वास्तव आहे. त्यामुळे ओझर मिग या शहरातील लोकसंख्येचा विचार करता नवीन पाणीपुरवठा योजना राबविण्याची नितांत आवश्यकता लक्षात घेऊन सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानातून पाणीपुरवठा योजनेचे काम विशेष प्राधान्याने घेण्याची सातत्याने केलेली मागणी परंतु या मागणीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष परिणामी या शहरातील नागरीकांना पिण्याच्या पाण्याचा टंचाईचा सामना करावा लागत असल्याने शासनाने या बाबीची नोंद घेऊन तातडीने पाणीपुरवठा योजना राबविण्याची असलेली आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही. |
| (५२) | ५५९० | १०० | ओझर मिग नगरपरिषद हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा गोळा होत असून या कचऱ्याची विल्हेवाट लावणेकरीता कुठलाही प्रकल्प या ठिकाणी उपलब्ध नसल्याने सद्यस्थितीत सदरचा कचरा हा शहरालगत असलेल्या मोकळया जागेत सदरचा कचरा टाकला जात असून बऱ्याचदा या कचऱ्याच्या गंजाला आग लागून शहरामध्ये दुराचे लोळ पसरून प्रदूषण होत असल्याने नागरीकांच्या आरोग्याचा मोठा प्रश्न निर्माण होणे. परिणामी या ठिकाणी कचऱ्याची विल्हेवाट लावणेकरीता घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प मंजूर करून कार्यान्वित करण्याची असलेली नितांत आवश्यकता परंतु याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष. याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (५३) | ५५०१ | १० | येवला (जि.नाशिक) शहरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे नव्याने निर्माण झालेल्या नागरी वस्तीमुळे अस्तित्वातील पाणीपुरवठा योजनेवर प्रचंड ताण निर्माण झालेला असणे, पालखेड डावा कालवा उदभव असलेल्या शहर पाणीपुरवठा योजनेच्या साठवण तलावाची क्षमता कमी पडत असल्यामुळे शहराला सहा दिवसाआड पाणी मिळत असणे, शहर पाणीपुरवठा योजनेच्या साठवण तलावाची क्षमता वाढवणे किंवा नवीन साठवण तलाव निर्माण करण्याची आवश्यकता असणे, शहरातील सर्व घरांना नळ जोडणी देण्याकरिता वाढीव कुटुंबासाठी व नव्याने निर्माण झालेल्या वसाहतींसाठी अंतर्गत वितरण व्यवस्था निर्माण करणे, नादुरुस्त जलवाहिन्या बदलणे, पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेत सुधारणा करणे, ३.५ व ९.५ एलएलडी जलशुद्धीकरण केंद्राची दुरुस्ती करणे - क्षमता वाढविणे, जलशुद्धीकरण केंद्रासाठी सौरउर्जा प्रकल्प निर्माण करणे, शहरातील नळजोडणीला वॉटर मीटर बसवणे या कामांचा वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये समावेश करून अमृत २ अभियानातून शहराच्या या योजनेला तांत्रिक व प्रशासकीय मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (५४) | ५५१३ | १० | महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान येवला (जि. नाशिक) शहराच्या मलनिस्सारण प्रकल्पास चालु दरसूचीनुसार सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी लोकप्रतिनिधी दि. १८ फेब्रुवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व प्रधान सचिव नगरविकास यांच्याकडे मागणी केलेली असणे, येवला शहराच्या मलनिस्सारण प्रकल्पाच्या रक्कम रू. ५२.४६ कोटीच्या कामाला शासनाने दि. १३ एप्रिल २०२२ च्या शासन निर्णयामध्ये महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान मधून मंजुरी दिलेली असणे, तथापी या कामाला जुन्या दरसूचीनुसार दि. २९ जानेवारी २०२० रोजी तांत्रिक मान्यता मिळालेली असणे, परिणामी या कामाच्या अंदाजपत्रकामध्ये वाढ झाल्यामुळे मजीप्राच्या चालु दरसूची प्रमाणे रक्कम रु. ७०,१४,८१,९३० च्या कामाला मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी दि. १० फेब्रुवारी २०२३ रोजी सुधारित तांत्रिक मंजुरी दिलेली असणे, या कामाला मजीप्राची तांत्रिक मान्यता घेवून सुधारित अंदाजपत्रकास व आराखड्यास सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी येवला नगरपरिषदेने दि. १७ फेब्रुवारी २०२३ रोजी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला असणे, येवला शहरातील स्वच्छतेची समस्या लक्षात घेवून या प्रकल्पाचे काम तत्काळ सुरू होणे अत्यावश्यक असणे, सदर मलनिस्सारण प्रकल्पाला चालु दरसूचीनुसार लवकरात लवकर सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (५५) | ५६५६ | १०० | पंधराव्या वित्त अयोगातून नगर विकासाची अनेक कामे हाती घेण्यात येत असणे, मात्र पंधराव्या वित्त आयोगाचा निधी केंद्राकडून सुमारे 9 महिन्यापासून मिळालेला नसल्याने अनेक कामे व देयके थकीत असल्याने नगर परिषद-पालिका प्रशासने हवालदिल असणे, सदर निधी तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत होत असलेली मागणी, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (५६) | ५४९६ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषद व सावली आणि सिंदेवाही नगरपंचायतीच्या कार्यालयीन कामकाजानुसार आवश्यकता असलेले सर्व पदे मंजूर असणे, या तीन ही नगरपरिषद/नगरपंचायतीमध्ये अधिकारी व कर्मचारी यांच्या अनेक जागा रिक्त असल्याने कामकाजात अडचणी निर्माण होणे, शहरातील विविध विकास कामे ठप्प असणे, नागरिकांना सुध्दा याचा आर्थीक व माणसिक त्रास सहण करावा लागणे, शहरातील विविध विकासकामे करण्यासाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या जागा मोठया प्रमाणात रिक्त असून त्यात मुख्याधिकारी, स्थापत्त विभागाचे अभियंता, पाणी पुरवठा विभागाचे अभियंता, मूख्य लेखा अधिकारी, प्रशासकीय अधिकारी यासह अनेक महत्वाच्या पदाचा समावेश असणे, त्यामुळे हे सर्व रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी लोकप्रतिनिधीसह नागरिकांनी वारंवार करणे, परंतू ही सर्व रिक्त पदे भरण्याबाबत अघापही कोणतीच कार्यवाही शासनाकडून होत नसल्यामुळे नागरिकात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषद |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आणि सावली व सिंदेवाही-लोणवाही नगरपंचायत मधील मुख्याधिकारी, प्रशासकीय अधिकारी, मुख्य लेखा अधिकारी, लेखा अधिकारी, स्थापत्य अभियंता यासह कर्मचाऱ्यांचे रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (५७) | ५४९८ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सर्व तालुका मुख्यालयी असलेल्या नगरपरिषद/नगरपंचायत मध्ये मुख्याधिकाऱ्यांची १५ पदे मंजूर असून फक्त ५ मुख्याधिकारी कार्यरत असणे, एका एका मुख्याधिकारी कडे २ ते ३ नगरपंचायत/ नगापरिषदेचा प्रभारी कार्यभार असल्यामुळे नगरपरिषदेच्या कामाकाजावर विपरित परिणाम पडणे, तसेच विकासकामे संथ गतीने सुरू असणे, नागरिंकाचे कामे सुध्दा वेळेवर होत नसल्यामूळे नागरिकांना आर्थिक व माणसिक त्रास सहन करावा लागणे, त्यामुळे ही सर्व रिक्त पदे भरण्याबाबत नगरविकास विभागाकडे वांरवार मागणी करून सुध्दा अघापही रिक्त पदे भरण्यात आलेली नसल्यामूळे नागरिकात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील मुख्याधिकारी यांचे रिक्त असलेले सर्व पदे भरण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (५८) | ५५२४ | १० | चंद्रपूर शहराला लागून असलेल्या व चंद्रपूर महानगरपालिका अंतर्गत नवीन चंद्रपूर येथील मल निसारण गटार वाहिणी व STP, 24 MLD या कामाचे M/S Eagal inFra India Ltd या कंपनीला ५३ कोटी २९ लाख २२ हजार रूपयाचे बांधकामाचे कंत्राट देण्यात येणे, मल निसारण STP प्लॉन्टचे बांधकाम दिंनाक १८ जुलै २०२२ रोजी आलेल्या पहिल्याच पावसात वॉल कंपाउंडची भिंत कोसळून पडणे, याकामात वापरण्यात आलेले सर्व साहित्य नित्कृष्ट दर्जाचे असल्याने वॉल कंपाउडची भिंत कोसळलेली असणे, गटार मॅन होल्डचे सुध्दा काम नित्कृष्ट दर्जाचे झालेले असल्याने गटार मॅन होल्ड २५९४ पैकी १८५० मॅन होल्ड हे क्रॅक व तुटलेले असल्याचे निर्देशनास येणे, या गंभीर प्रकरणाची तक्रार संजीवनी पर्यावरण सामाजिक संस्था चंद्रपूर यांनी दिंनाक ८ ऑगस्ट २०२२ मध्ये व त्यानंतर वारंवार मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्याकडे करण्यात येणे, मात्र या गंभीर तक्राराची अघापही चौकशी होत नसल्याने शासनासह प्रशासनातील अधिकारी या गैरप्रकाराला पांघरुन घालत असल्याचे नागरिकांच्या मनात संशय निर्माण होणे, जवळपास ५४ कोटीच्या कामात कुणाचेही नियं नसल्याने व तक्रार करून सुध्दा चौकशी होत नसल्याने या कामात नित्कृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन करोडो रूपयांचा मोठया प्रमाणात गैरप्रकार होत असल्याने नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबधित कंपनीवर कठोर कार्यवाही करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही,उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (५९) | ५५२७ | १० | ग्रीन प्लॅनेट कॉलनी, मानेवाडा (ओंकारनगर) नागपूर येथील पब्लिक युटिलिटीसाठी असलेले चार मोकळया जागेवरील करोडो रूपयांची जागा असलेले पाच अनाधिकृत भूखंड बिल्डर व एनआयटी नागपूर येथील अधिकाऱ्यांच्या संगनमताने नियमित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणे, राघवेंद्र गृह निर्माण सहकारी संस्था या नावाने |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | ओळखल्या जाणाऱ्या वसाहतीतील नागरिकांनी त्यांच्या लेआऊटच्या मोकळया जागा खेळाचे मैदान, उघान आणि मनोरंजनात्मक उपक्रमांसाठी जतन करण्यासाठी एनआयटीकडे वारंवार निवेदन देणे, पब्लिक युटिलिटीसाठी असलेले चार मोकळया जागेवरील पाच भूखंड बाबत या परिसरातील नागरिकांच्यावतीने नागपूर उच्च न्यायालयात केस दाखल करण्यात येणे, सदर प्रकरण न्याय प्रविष्ट असतांना सुध्दा चक्क पब्लिक युटिलिटीसाठी असलेली जागा बिल्डरांना देण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात येत असल्याने स्थानिक रहिवासीयामध्ये पसरत असलेले तिव्र असंतोश व संतापाचे वातावरण परिणामी रघुवेंद्र गृहनिर्माण सहकारी संस्थेतील ग्रिन प्लॉनेट कॉलनीतील पब्लिक युटिलिटीसाठी असलेली जागा त्याच कामाकरीता उपयोगात आणण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (६०) | ५६९५ | १० | दर्यापूर मंतदारसंघातील दर्यापूर आणि अंजनगाव सुर्जी या नगरपालिकांचा झपाट्याने भौगोलिक विकास होत असणे , दोन्ही शहरात मोठ्या प्रमाणात नवीन वस्त्या विकसित होत असल्याने या भागात मूलभूत सुविधांचा अभाव असणे , दोन्ही नगरपरिषद अंतर्गत नागरी क्षेत्राचा विकास होण्याच्या दृष्टीने नगर विकास विभागाच्या विविध योजणाचे १० कोटी अनुदान विविध विकासकामांसाठी मंजूर असणे तसेच निविदा प्रक्रियेत असणे , परंतु सदर कामावरील शासनाच्या आदेशायान्वये स्थगिती असणे , सदर कामे होणे अत्यंत आवश्यक असून यावरील स्थगिती रद्द करण्याची नितांत आवश्यकता असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. |
| (६१) | ५७०४ | १० | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत न.प. अंजनगाव सुर्जी येथील विस्तारीत पाणीपुरवठा योजनेचे काम रखडले असून शहानुर जलपूर्ती केंद्रापासून येणाऱ्या मुख्य जलवाहिनीला नवीन साठवणूक टाकीशी जोडण्यासाठी टाकण्यात आलेली पाईपलाईन शहरातलगत असणाऱ्या शेतमालकाने अडवल्यामुळे सात कोटी रुपये खर्च करून निर्माण केलेली योजना ठप्प झालेली असून तीन वर्षात काम करण्याचा करारनामा चार वर्षे पूर्ण झालीये तरी पूर्ण झाला नसणे , अंजनगाव सुर्जी शहरात कृत्रिम पाणीटंचाई निर्माण होत असून या योजनेच्या पूर्ततेने यंदा अंजनगाव सुर्जी शहरवासीयांना मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध होणार असणे , सदर योजनेचे रखडलेले काम पूर्ण करण्याची नितांत आवश्यकता असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६२) | ५७१२ | १० | न. प. दर्यापूर जि. अमरावती या नगर परिषदेची २९ जून २०२१ रोजी शासन अधिसूचनेनुसार हद्दवाढ झाली असून यात दर्यापूर शहारा लगत असलेल्या मौजे जहानपुर , पेठ इतबारपूर , गायवाडी , शिवर , लेहेगाव या गावातील बहुतांश भागांचा समावेश झालेला असणे सदर समाविष्ट झालेल्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात मूलभूत सुविधेचा अभाव असणे , स्थानिक लोकप्रतिनिधीनी हद्दवाढीच्या विकासासाठी २५ कोटी निधी उपलब्ध करून देणेबाबत मा. मंत्री नगरविकास यांना लेखी पत्राद्वारे कळवले असणे , परंतु अद्यापही निधी उपलब्ध झालेला नसणे , यामुळे या भागातील नांगरिकामध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (६३) | ५३३२ | १० | मुंबई उपनगरातील मालवणी, गेट क्रमांक ८, मालवणी बेस्ट आगारा जवळ मालाड (पश्चिम ) सर्वे क्र. २६३, सी.टी.एस. क्र.३५२५ येथील एम.एच.बी इंग्रजी व उर्दु मनपा शाळा क्र. ३ या शाळेची पुर्नबांधणी करणे गरजेचे असणे, शाळा महानगरपालिकेने गत ५ वर्षापुर्वीच पाडली आहे. त्या पाडलेल्या मनपा शाळेची इमारत त्याच जागेवर पुर्नबांधणी करुन शाळेची इमारत उभारण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, त्या भूखंडाचा शिक्षणाच्या पायाभूत सोयी सुविधेसाठी उपयोग करण्याची तीव्र निकड असणे, शाळेअभावी मुलांची शिक्षणाची गैरसोय होत असणे, मुलांना इतरत्र प्रवेश मिळत नसणे, मुलांची कुंचबना होत असणे, मनपाचे संबंधित अधिकारी अक्षम्य दुर्लक्ष करीत असणे, परिणामी स्थानिक नागरिकांत व पालकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (६४) | ५३३३ | १० | सामान्य रुग्णालय, मालवणी, जनकल्याण नगर, भूमिपार्क, मालाड, पश्चिम मुंबई येथे सार्वजनिक बांधकाम विभागने अधिकारी कर्मचा-यांच्या निवासासाठी इमारत बांधली असणे, सदरच्या इमारतीला महानगरपालिकेने भोगवटा प्रमाणपत्र (ओ.सी) दिली नसणे, महानगरपालिकेने संबंधित अधिकारी टाळाटाळ करीत असणे, संबंधित अधिका-यांच्या मनमानी कारभार सुरु असणे, म.न.पा च्या संबंधित अधिका-यांची विभागीय चौकशी करण्याची आवश्यकता असणे, यासंदर्भात कर्तव्यात कसुन व कामात हलगर्जीपणा केल्याप्रकरणी कठोर कार्यवाही करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक नागरिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची व तातडीची उपाययोजना. |
| (६५) | ५३३४ | १० | इनफिनिटी मॉल ( Back Road) ते लगून रोड मालाड पश्चिम, मुंबई येथे असून सदरचा रस्ता जोडण्यासाठी त्याठिकाणी पूल बांधण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, पुलाचे क्षेत्र ०.९९ हेक्टर कांदळवण बाधीत व १९८ मॅनग्रोव्ह क्षेत्र बाधीत असणे, पूल कांदळवन क्षेत्र व सी.आर. झेड. बाधीत असणे, सी.आर.झेड. व वन विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता निर्माण झाली असणे, शासनाने ना हरकत प्रमाण पत्र प्राप्त करुन घेण्यासाठी मे. टंडन अर्बन सुलोशन प्रा. लि. या सल्लागार कंपनीची नियुक्ती केली असणे, सदरच्या कंपनीने त्याकडे दुर्लक्ष केले असणे, परिणाम स्वरुप सी.आर.झेड. व वन विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्र मिळाले नसणे, त्यामुळे पुलाचे काम सुरु करता आले नसणे, परिणामी स्थानिक नागरीकांची गैरसोय होत असणे, पुला अभावी वाहतूक कोंडी निर्माण होत असणे, स्थानिकांना लांबून यावे व जावे लागत असणे, परिणाम स्वरुप स्थानिक नागरीकांत व जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व शासनाप्रती निर्माण झालेली चिडीची भावना, ना हरकत प्रमाणपत्र व पुलाचे काम तातडीने सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (६६) | ५३३६ | १० | मालवणी मालाड (पश्चिम), मुंबई येथे महानगरपालिकेचे मलनि:सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्याचे प्रस्तावित असून सन १९८३ पासून सदरचा प्रकल्प प्रलंबित असणे, मालवणी येथील सर्व्हे नं.२६३ (पै.) सी.टी.एस.नं.२८४१ (पै) मधील सुमारे ८३.६२ हेक्टर क्षेत्रफळाचा भूखंड म.न.पा.च्या ताब्यात असून त्यापैकी फक्त ३५ हेक्टर जागेवर मलनि:सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारण्यासाठी, मुंबई महानगरपालिकेने सदर जमिनीचा ताबा मालकी हक्कासाठी सन १९९४ साली सुमारे ६९,८६,६४०/- एवढया रक्कमेचा भरणा जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरे यांच्याकडे केला असणे, मलनि:सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्रात क्षमतेपेक्षा जास्त म्हणजे सुमारे ४०० एल.एल.डी.सांडपाणी मालाड खाडीत सोडण्यात येत असणे, त्यामुळे मोठया प्रमाणावर जलप्रदूषण निर्माण होऊन जलचर प्राणी मृत्यूमुखी पडत असणे, त्यामुळे मानवी आरोग्यावर विपरित परिणाम झाला असणे, परिणामी स्थानिक रहिवाशाच्याय आरोग्यास धोका निर्माण झाला असून पर्यावरणाचा समतोल बिघडला असणे, पर्यावरणाचा धोका टाळण्यासाठी मालाड मलनि:सारण सांडपाणी प्रक्रिया केंद्र तातडीने कार्यान्वित करणे आवश्यक असणे, याकडे शासनाने व महानगरपालिकेने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (६७) | ५३७३ | १० | मालवणी लगून रोड ते अब्दुल हमीद मार्ग (बस डेपो जवळ), मालवणी, मालाड (प.) मुंबई असा रस्ता करणे, डी.पी. रस्ता रुंदीकरणाचे काम अपूर्ण असणे, १८.३० मीटर रस्त्याचे रुंदीकरण करणे, रस्ता रुंदीकरणाच्या बाधित धारकानी सादर केलेल्या कागदपत्राची पडताळणी करणे, बाधितांची पात्रता निश्चित करणे, जिल्हाधिकाऱ्यांनी सदरची जागा म.न.पा.ला रस्ता रुंदीकरणासाठी हस्तांतरीत करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, विषयांकित भूखंडाचे सिमांकना आधारे संयुक्त मोजणी करणे, रस्त्याचे रुंदीकरणाचे काम तातडीने सुरु करण्यची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (६८) | ५३७४ | १० | मुंबई शहर व उपनगरामध्ये प्रचंड वाहतुक कोंडी होत असणे, वाहतुक कोंडी दूर करण्यासाठी शहर व उपनगरामध्ये भूमीगत वाहनतळ उभारण्याची आवश्यकता असणे, इन्फीनिटी मॉल, मालाड (प.) मुंबई येथे उद्यान / बगीचा असून उद्यान / बगीच्या जागेवर भूमिगत वाहनतळ बांधण्याची अत्यंत गरज असणे, सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) अथवा महापालिका वास्तुविशारद यांनी सर्व्हे करणे, या संदर्भात लोकप्रतिनिधींना, मा. पालिका आयुक्त, म.न.पा. व सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांच्याकडे मागणी केली असणे, याकडे शासनाने केलेले दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकात निर्माण झालेला तीव्र असंतोष व शासना प्रती निर्माण झालेली चिडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (६९) | ५३७५ | १० | धारवली पूल, मार्वे - मढ रोड, मालाड (प.) मुंबई येथे ६० वर्ष पूवीचा धारवली पूल असून, नवीन धारवली पूल म.न.पा.ने बांधण्याची आवश्यकता असणे, सदरचा पूल कांदळवन क्षेत्र बाधित असणे, MCZMA, सी.आर.झेड, वन खाते या विभागाचे ना हरकत प्रमाण पत्राची गरज असणे, ना हरकत प्रमाण पत्र प्राप्त करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती केली असणे, सल्लागार कंपनीने कोणतेच काम केले नसणे, कांदळवन क्षेत्र बाधित १७ हेक्टर असून त्यामध्ये ५६ मॅनग्रोह क्षेत्र असणे, ना हरकत प्रमाण पत्र मिळण्याची अवश्यकता असणे, याकडे बृहन्मुंबई महानगरनगर पालिका व शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र अंसतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (७०) | ५३७६ | १० | मुंबई उपनगरातील अंधेरी पश्चिम येथील मे ओशिवरा लँड डेव्हलपेंट कंपनी प्रा. लि. या कंपनीच्या ताब्यातील क्षेत्रावर नागरी जमीन कमाल धारणा कायदा कलम २० अन्वये गृह बांधणी प्रयोजनार्थ विकासकाला सूट देण्यात येते, त्यानुसार विकासकाला सूट दिली असणे, मौजे ओशिवरा ता. अंधेरी येथील सर्व्हे क्र. ४१ येथील क्षेत्रावर विकासकाकडून अनियमितता झाली असणे, विकासकाने अत्यंत उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गटातील सदनिका बांधणे आवश्यक असणे, मात्र विकासकांनी सदनिका बांधल्या नसणे, त्या संदर्भात विकासकावर कठोर कार्यवाही करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, मनपाचे संबंधित अधिकारी अहवाल देण्याचे टाळाटाळ करीत असल्याचे दिसून येत असल्याचे स्पष्ट झाले असणे, नागरी जमीन (कमाल धारणा विनियमन) अधिनियम, १९७६ व्या कलम ३४ अन्वये सदनिकाच्या आकारमानाबाबत महानगरपालिका व संबंधित अधिकारी या कार्यालयाच्या अधिका-यांनी सयुंक्तरीत्या बारकाईने पहाणी करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, तथापि या ठिकाणी तसे घडत असल्याचे दिसून येत नसणे, शासनास अहवाल सुध्दा सादर केला नसणे, मनपा व शासनाचे संबधित अधिकारी विकासकाला मदत करीत असणे, संबंधित अधिका-यांव व विकासकाचे संगनमत असणे, त्यामुळे शासनाचे नुकसान होत असणे, विकासकावर कोणतीच कार्यवाही होत नसणे, याला तिन्ही यंत्रनेतील अधिकारी जबाबदार असणे, या कामात दिरंगाई व कर्तव्यात कसूर केल्या प्रकरणी कठोर कारवाई करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे मनपा व शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी शासनाचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असणे, याबाबत स्थानिकात निर्माण झालेला तीव्र असंतोष व मनपा व शासना प्रती निर्माण झालेली विडीवी भावना या संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तातडीची उपाययोजना प्रतिक्रिया. |
| (७१) | ५३७७ | १० | मुंबई उपनगरातील मालाड पश्चिम येथील मढ व मार्वे रोड हा रस्ता मुंबई शहरातील मुख्य रस्त्यापैकी मढ व मार्वे रोड हा एक महत्वाचा रस्ता असून या रस्त्यावर मढ़ आयलॅण्ड मार्गे समुद्र किनारा, मढ बीच, आक्सा चौपाटी, मढ हवाई दलाचे केंद्र, भारतीय नौसेनेचा हमला व एस. एल. वर्ल्डला जाण्यासाठी महत्वाचा रस्ता असणे. त्याच प्रमाणे पर्यटकाचे महत्वाचे ठिकाण असून रस्ता तातडीने रूद करण्याचे काम मंद गतीने सुरू असणे, मढ व मार्वे रोड़ रूढी करणास शासनास आलेले अपयश परिणाम स्वरूप रस्त्यावर निर्माण |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | झालेली वाहतूक कोंडी, लिंकरोड व मिठ चौकी येथे प्रचंड वाहतूक कोंडी होत असणे, त्याच प्रमाणे अप्पर मढ ते मार्वे टी जंक्शन या दरम्यानच्या मार्वे रोडच्या रूढीकरणाचे काम गेल्या १५ वर्षापासून अपुर्ण आवस्थेत असणे, याकडे पी / उत्तर विभागाचे सहायक आयुक्त दुर्लक्ष करीत असणे, परिणाम स्वरूप खारोडी ते मार्वे टी जंक्शन दरम्यान दररोज प्रचंड वहातूक कोडी निर्माण होणे, त्या ठिकाणी वाहातूक कोंडीमूळे १ - २ तास लागत असणे, त्यामुळे वायु व ध्वनी प्रदुषण निर्माण होणे. त्याचा स्थानिक रहिवाशाच्या आरोग्यावर परिणाम होणे, पालिका पी / उत्तर विभागाचे सहायक आयुक्त व कार्यकारी अभियंता मढ व मार्वे रोडच्या रुंदीकरणाच्या कामाकडे लक्ष देत नसणे, पालिकेचे अधिकारी अकार्यक्षम असणे, या बाबीकडे संबधित अधिकारी दुर्लक्ष करीत असणे परिणामी जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष व म.न.पा. व शासना प्रती निर्माण झालेली विडीची भावना व वाहतूक कोंडी दूर करण्याच्या दृष्टीने म.न.पा. व शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (७२) | ५३८० | १० | अंबोजवाडी, मालवणी, कलेक्टर लॅन्ड, मालाड (प.) मुंबई या विभागात मोठया प्रमाणावर मुस्लीम सजाज रहात असून त्यांना अंत्यविधीसाठी (५ एकर) व (१ एकर) शिया मुस्लीम स्मशानभूमीची आवश्यकता असणे, तसेच म.न.पा. इमारत व परिक्षण खात्यातर्फे स्मशान भूमीच्या कामाकरीता सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता शासनाने १४ कोटी निधीची तरतूद केली असणे, सदरचा निधी अपुरा असणे, स्मशान भूमीसाठा निधी वाढविण्याची आवश्यकता असून स्मशान भूमीचे काम तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता, निर्माण झाली असणे, याकडे म.न.पा. व शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत म.न.पा. व शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रईस शेख** |
| (७३) | ५७२६ | १०० | भिवंडी तालुका एमएमआरडीए हरीतील मौजे राहनाळ गाव, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील सव्हे क्र. १३१ पाहता हक्काचे मुळ पत्रक हे मध्यवती रेल्वेच्या नावे असतांना ५२ गावे अधिसूचित केलेले एमएमआरडीए ठाणे विभाग यांनी भिवंडी महानगरपालिका यांच्या डिपीमधील प्रस्तावित रिंगरोडमध्येच बेकायदेशीररीत्या गैरव्यवहारातुन गैरलाभ घेऊन एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी विकासयोजना मंजुर केलेली आहे. भुमिअभिलेख यांच्या आकारबंदप्रमाणे दोनच सातबारे घडलेले असतांना तलाठीला हाताशी धरून वाढीव क्षेत्राचे बनावट सातबारे बनवून मध्यवर्ती रेल्वेच्या जागेवरती अनाधिकृत बांधकाम केलेले आहे ४ वर्षापूर्वी एमएमआरडीएने अधिसूचित केलेले विकासयोजना आराखडा प्रमाणे विकासक व एमएमआरडीए च्या अधिकाऱ्यांनी हातमिळवणी करुन संपुर्ण विकास आराखडा बदलून टाकलेला आहे विकासकाच्या सोयीनुसार डिपी रोड व आरक्षणे बदलण्यात येतात त्याचप्रमाणे तेथील हरिधारा कॉम्प्लेक्समध्ये सर्व्हे के. १३१ च्या सातबाऱ्याचा संपुर्ण चटईक्षेत्र पुर्वीच वापरला जाऊन विकला गेला असल्यामुळे पुनःश्च त्याच सातबाऱ्याचे गैरव्यवहारातुन गैरमार्गाने बांधकाम परवानगी देण्यात आलेले आहे हे सर्व गैरप्रकार महाभारतातील गांधारीचे सोंग |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | घेण्यासारखे आहे मध्यवर्ती रेल्वेच्या जमिन मिळकतीत टोलेजंग इमारत होत असतांना मध्य रेल्वेनेसुध्दा या प्रकरणामध्ये कानाडोळा केलेला आहे हे संपूर्ण बांधकाम बनावट कागदपत्रांच्या आधारे एमएमआरडीए महसुल विभाग व ग्रामपंचायत विभाग यांच्या हातमिळवणीतुन विकासकाने केलेला सर्वात मोठा गुन्हा होय त्यामुळे संबंधित अधिकारी व विकासक यांची गृहविभागाकडुन सखोल चौकशी करुन त्यांच्यावरती गुन्हे दाखल करणेबाबत दि. २८/२/२०२३ रोजी मुख्यसचिव मंत्रालय मुंबई व आयुक्त एमएमआरडीए मुंबई यांच्याकडे नागरीकांनी तक्रारी दिलेले असुन महानगरपालिकेच्या रिंगरोडच्या विकास आराखडामध्ये या अनाधिकृत बांधकामामुळे बाधा आल्याने तात्काळ निष्कासनाची कारवाई करण्यासाठी शासनाने सखोल चौकशी करून करावयाची कार्रवाई शासनाची प्रतिक्रिया व शासनाची भुमिका. |
| (७४) | ५७३३ | १०० | भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका या ठिकाणी भूयारी गटार योजनेसाठी स्किम फेस-२. भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी अंतर्गत सुवर्ण जयंती नगरोधान अभियान अंतर्गत भिवंडी महापालिकेला भुयारी गटार योजनेचे योग्य प्रकारे व नियोजनबध्द भिवंडी शहरातील मल:निसारणाचे काम करता यावे म्हणुन कन्सलटन व सरकारकडून देखरेख म्हणुन ५ संस्थेची नेमणुक केले होते. भूयारी गटार योजना निविदा ४६२ कोटी रुपयांची होती त्यापैकी ६ एचटीपी व १० पंपींग स्टेशन व नादुरुस्त केलेले रस्ते बांधण्याची निविदा दिली होती ते बांधण्यापुर्वीच या ४ संस्थांनी व महानगरपालिकेने ३३७ कोटी रुपये ठेकेदारास इंगल कन्स्ट्रक्शन यास गैरव्यवहारातून गैरलाभ मिळवून अदा केलेले आहे, भुयारी गटार योजना ही सरकारी योजना न राबवता भिवडीच्या जनतेसाठी फसवी योजना राबवण्यात आली सदर निविदेमध्ये ५० कोटी रुपये परस्पर गैरव्यवहारातून गैरलाभ मिळुन देण्यात आलेला आहे. याची सखोल चौकशी साठी कमिटी नेमुन संबंधितांवरती कार्रवाई करणे गरजेचे आहे, कारण या भुयारी गटार फसवी योजनेमध्ये अनियमितता व अगुणवत्ता आढळून आल्याने ठेकेदाराच्या निकृष्ट कामामुळे रस्ते नादुरुस्त होऊन २००० लोकांचे अपघात झालेले आहे त्यामध्ये अनेक लोक मृत्युमुखी पडलेले आहेत यास सर्वस्व जबाबदार ठेकेदार व महापालिकेचे अधिकारी असून सदर निविदेमध्ये व निकृष्ट दर्जाच्या कामामध्ये खुप मोठा घोटाळा झाला असुन याची सखोल चौकशी होण्यासाठी दि. २८/२/२०२३ रोजी मा. मुख्यसचिव मंत्रालय मुंबई यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आलेली असुन संबंधित संस्थांनी केलेले गैरव्यवहार व ठेकेदार यांच्यावरती कठोर ती कठोर कार्रवाई करण्यासाठी शासनाने सखोल चौकशीसाठी अतिगंभीरतेने लक्ष घालून शासनाने करावयाची कार्यवाहीव उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**रूपये:- ४,४५,५९,०१,०००/-**<br>**श्री. संजय जगताप** |
| (७५) | ५६२७ | १० | १) सासवड नगररिषद, ता. पुरंदर, जि. पुणे हद्दीतील श्री सिध्देश्वर मंदिराकडे जाणारा रस्ता व चांबळी नदीवरील पुलाबाबत.सासवड नगरपरिषद हद्दीतील ऐतिहासिक, पुरात्न सिध्देश्वर मंदिराकडे जाणारा रस्ता व चांबळी नदीवरील पुल करण्याबाबत नागरीकांची व शेतकऱ्यांची मोठी मागणी आहे. सदर मार्गाची सन २०१९ पासून पुरंदर तालुक्याच्या पश्चिम भागात होत असलेल्या अतिवृष्टी व सलग पावसामुळे ओढे नाले भरून वाहिल्याने चांबळी नदीला आलेल्या पुरामुळे रस्ता व पुलाच्या संरक्षक भिंती, बॉरीगेट तसेच पुलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान / पडझड झालेली आहे. तसेच यामार्गावर सासवड येथील ५० ते ६० % शेतकऱ्यांच्या शेतजमीनी असून शेतमालाची मोठ्या प्रमाणात वाहतुक होत असते. त्यानुषंगाने परिसरातील भाविक - पर्यटक शेतकरी यामार्गात कोडीत, गराडे, खेडशिवापूरकडे जाणाऱ्या नागरीकांची अडचण गैरसोय लक्षात घेऊन पत्रव्यवहार व पाठपुरावा करून नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र. रस्ताअ - २०२२/प्र.क्र.९८ब (३१)/नवि-१६ दि. ३० मार्च २०२२ अन्वये विशेष रस्ता अनुदानातून या व अशाच प्रकाराच्या कामासाठी रक्कम रूपये ३,२६,१९,२९७ /- इतका निधी शासन निर्णयान्वये मंजुर झालेला होता. परंतु सदर कामांस स्थगिती दिली गेली आहे. तरी सासवड नगररिषद, ता. पुरंदर, जि. पुणे हद्दीतील श्री सिध्देश्वर मंदिराकडे जाणारा रस्ता व चांबळी नदीवरील पुलाकरीता निधी उपलब्ध व्हावा. |
| | | | **मागणी क्रमांक: एफ-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३४७५, इतर सर्वसाधारण आर्थिक सेवा**<br>**रूपये:- १,०००/-**<br>**श्री. चेतन तुपे** |
| (७६) | ५५७३ | १० | पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट गावांमधील पूर्वीच्या ग्रामपंचायत हद्दीमध्ये असतानाच्या 40 40 वर्षांपासूनच्या बांधकामांना तीनपट टॅक्स आकारल्याने त्यांच्यावर होत असलेला अन्याय,समाविष्ट झाल्यानंतर नव्या बांधकामांना परवानगी देताना फक्त एकपट टॅक्स आकारला जाणे,मात्र पूर्वीच्या वर्षानुवर्षे राहत असलेल्या लोकांना तीन पट टॅक्स आकारल्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेला तीव्र संतोष,तीन पट टॅक्सची अट रद्द करून एकपटच टॅक्स आकारण्याची आवश्यकता शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष. |
| (७७) | ५५७६ | १० | पुणे महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना मालमत्ता कर भरण्याचे कामे पूर्वी असलेली चाळीस टक्के सवलतीची अट रद्द केल्यामुळे त्यांचे त्यामुळे होत असलेले आर्थिक नुकसान,लगतच्याच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सवलतीची पद्धत अजूनही लागू असणे,त्यामुळे दुजाभाव-अन्याय होत असल्याची नागरिकांमध्ये निर्माण झालेली |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | भावना, पुणे मनपा हद्दीतील नागरिकांना मालमत्ता करामध्ये पूर्वीप्रमाणेच 40% सवलत देण्याची पद्धत अवलंबण्याची आवश्यकता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एफ-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३६०४, स्थानिक संस्था व पंचायतराज संस्था यांना नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे**<br>**रूपये:- २,७६,४७,६४,४३,०००/-**<br>**श्री. संजय जगताप** |
| (७८) | ५६३३ | १० | ३) श्रीक्षेत्र खंडोबा देवस्थान, जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे येथील जेजुरी नगरपरिषदेस सन २०१९ ते २०२३ अखेरचे यात्रा कर अनुदान मिळणेबाबत. श्री क्षेत्र जेजुरी खंडोबा देवस्थान हे अखंड महाराष्ट्राचे कुलदैवत असल्याने जेजुरी शहरामध्ये दर्शनासाठी दररोज असंख्य भाविक येतात तसेच वर्षभरात अनेक लहान मोठ्या यात्रा होत असून लाखो भाविक येत असतात. सदरच्या भाविकांना मुलभुत अत्यावश्यक सोई - सोविधा पुरविण्याची मोठी जबाबदारी ही नगरपरिषदेवर असते. जेजुरी नगरपरिषद हि 'क-वर्ग' दर्जाची व उत्पन्नाचे अर्थिक स्त्रोत कमी असल्याने जेजुरी शहरातील भाविकांना व नागरिकांना आवश्यक त्या सोई सुविधा पुरविताना नगरपरिषदेवर ताण येत आहे. त्यामुळे नगरपरिषदेने यापुर्वी पत्रव्यवहार करून यात्रा कर अनुदानांची रक्कम मिळणेकामी विनंती केलेली आहे.त्यानुषंगाने नगरविकास विभागाकडून सन २०२२-२३ चे अनुदान देण्याकरीता नगरपरिषद क्षेत्रावर यात्रा भरल्या होत्या किंवा नाही याबाबतची मागविलेली माहिती नगरपरिषदेने संदर्भीय पत्रान्वये दिलेली आल्याने सन २०१९ ते २०२३ यात्रा कर अनुदानांची रक्कम मिळण्याकरीता निर्णय व्हावा. |
| | | | **मागणी क्रमांक: एफ-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१७, नगरविकासावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- २२,१६,००,००,०००/-**<br>**श्री. छगन भुजबळ** |
| (७९) | ५४९५ | १० | नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान या योजनेतून येवला, जि. नाशिक शहरातील नगर परिषद मालकीचे केशवराव पटेल मार्केट येथे वाणिज्य संकुल बांधकाम, बहुमजली वाहनतळ बांधणे व इतर अनुषंगिक कामांसाठी निधी मिळण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. १० ऑगस्ट २०२२ व दि. २० डिसेंबर २०२२ रोजी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी केलेली असणे, येवला शहरातील या जुन्या भाजी मार्केटचा पुनर्विकास करण्याची नितांत आवश्यकता असणे, नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान या योजनेतून अनुदान मंजूर करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया. |
| (८०) | ५४९७ | १० | येवला (जि.नाशिक) नगरपरिषदेसाठी वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान ठोक तरतूद लेखाशिर्ष (४२१७०६०३) (२०२०-२०२१) अंतर्गत दि. २४/०२/२०२० च्या पत्रान्वये ५ कोटी निधीची तरतूद करण्यात आलेली असणे, या मंजूर अनुदानामधून जिल्हाधिकारी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नाशिक यांनी दि. ९ मार्च २०२१ च्या आदेशान्वये मुलभूत व प्राथमिक सोयीसुविधा पुरविण्यासाठी रुपये ४,९७,५९,७०२/- रक्कमेच्या २१ विकास कामांना प्रशासकीय मंजुरी दिली असणे, ही कामे पूर्ण झाली असून मात्र सदर कामांना अद्याप निधी प्राप्त झालेला नसणे, या कामासाठी निधी उपलब्ध न झाल्यामुळे कत्राटदारांनी उपोषणाचा इशारा दिलेला असणे, जिल्हाधिकारी नाशिक यांनी येवला नगरपरिषदेसाठी पत्र क्र. कक्ष २/नपा २/५८१/२०२२ दि. १५/३/२०२२ अन्वये नगरविकास विभागाकडे मागणी केलेला रुपये ४,९७,५९,७०२/- निधी उपलब्ध करून देणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८१) | ५४९९ | १० | येवला, जि. नाशिक नगर परिषद येथील कर्मचाऱ्यांकरिता निवासी इमारतीचे बांधकाम करण्याच्या कामासाठी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांनी रक्कम रु.१४९९.९७ लक्ष चे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे पाठविले असणे, येवला येथील नगर परिषद कर्मचाऱ्यांसाठी निवासी इमारतीची गरज असणे, नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान या योजनेतून येवला नगरपरिषद कर्मचारी निवासी इमारत बांधकाम करणे या कामाला प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया. |
| (८२) | ५५०० | १० | राज्याची राजधानी आणि देशाची आर्थिक राजधानी अशी ओळख असलेल्या मुंबई शहरातील स्कायवॉकमुळे मुंबईची स्कायलाईन खराब झालेली असणे, मुंबईत बांधण्यात आलेल्या स्कायवॉकपैकी मोजकेच स्कायवॉक वापरात असणे, उर्वरीत सर्व स्कायवॉकच्या भागात गलिच्छपणा वाढून दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण होत असणे, या स्कायवॉक प्रकल्पाची अंमलबजावणी करतांना योग्य नियोजन करण्यात आलेले नसणे, त्याची नेमकी गरज कुठे आहे याचा योग्य अभ्यास न करता ते बांधण्यात आल्याने स्कायवॉकचा पादचाऱ्यांकडून फारसा वापर होत नसल्याचे दिसून येणे. हे स्कायवॉक गर्दुल्ले आणि भिकारी यांचे आश्रयस्थान तर गुन्हेगारांचे अड्डे बनलेले असणे, त्यामुळे जगभरातून येणाऱ्या नागरिकांसमोर मुंबई शहरातील स्कायवॉकचे अतिशय ओंगळवाणे व दयनीय चित्र जात असणे, त्यामुळे मुंबई शहराची स्कायलाईन खराब करणारे आणि वापरात न येणारे हे स्कायवॉक काढून टाकणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपयायोजना. |
| (८३) | ५५०३ | १० | नाशिक शहरातील मेट्रो प्रकल्पास मंजुरी मिळण्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याची मागणी असणे, जगात वेगाने विस्तारणाऱ्या शहरांमध्ये नाशिकचा समावेश असणे, मुंबई नंतर नागपुर व पुणे येथे मेट्रो रेल्वे प्रकल्प सुरू होत असणे, मात्र नाशिक शहरात मेट्रो रेल्वे सुरु करण्यासाठी शासनाकडून दिरंगाई केली जात असणे, खरं तर नाशिक शहर आणि शहराला लागू असलेल्या त्र्यंबकेश्वर, गोंदे एमआयडीसी,भगूर,सिन्नर,ओझर या परिसरातील शहरांना जोडणारी मेट्रो किंवा रॅपिड रेल्वे केली जावी अशी मागणी असणे, नाशिक शहराचा झपाट्याने होत असलेला विकास व परिसरातील भागाचे होत असलेले शहरीकरण आणि आगामी वाढणाऱ्या लोकसंख्येचा विचार करता भविष्यात दळणवळणाची साधने अपुरी पडणार असणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | त्यामुळे नाशिक शहरासाठी लवकरात लवकर मेट्रो, रॅपिड रेल किंवा निओ मेट्रो प्रकल्पाचे काम सुरु होणे आवश्यक असणे, आता काम सुरु झाले तर आगामी ३/४ वर्षात मेट्रो साकारली जावू शकणार असणे, मात्र याबाबत नाशिक या मेट्रोपॉलीटीन सिटीकडे शासनाने दुर्लक्ष केल्याचे दिसून येत असणे, नाशिक शहरातील मेट्रो प्रकल्पास लवकरात लवकर मंजुरी मिळण्यासाठी राज्य शासनाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८४) | ५५०७ | १० | त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) नगरपरिषद क्षेत्रातील अहिल्या नदीवरील रस्ता- पुलाच्या बेकायदेशीर बांधकामाबाबत लोकप्रतिनिधी यांनी दि.८ फेब्रुवारी २०२३ रोजी जिल्हाधिकारी नाशिक यांच्याकडे तक्रार केलेली असणे, त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) नगरपरिषदेने माहे डिसेंबर २०२२ मध्ये अहिल्या नदीवर बेकायदेशीरपणे पुलाचे व रस्त्याचे बांधकाम सुरु केलेली असणे, विकास योजनेमध्ये सदर क्षेत्र ग्रीन झोन मध्ये असून या ठिकाणी रस्ता व पूल दर्शविलेला नसणे, गोदावरी नदीची उपनदी असलेल्या अहिल्या नदीपात्रात केल्या जाणाऱ्या या रस्ता - पुलामुळे नदीचा मुख्य स्रोत नष्ट होणार असल्याने पावसाळयामध्ये पाण्याचा प्रवाह अडून येथे मोठी दुर्घटना होण्याचा संभव असणे, सदर नदीवर पूल बांधतांना नगरपरिषदेने जलसंपदा विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक असणे, तसेच शासकीय निधीतून खाजगी मालमत्तेसाठी रस्ता व पूल करणे हे अतिशय बेकायदेशीर असणे, दि. ३ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या त्र्यंबक नगरपरिषद जनरल बोर्ड सभेने हा रस्ता पूल करणेसाठी विरोध दर्शविलेला असूनही नगरपरिषदेने सर्व नियम आणि निकषांकडे दुर्लक्ष करून बेकायदेशीरपणे या पुलाला मंजुरी देवून त्याचे बांधकाम हाती घेतलेले असणे, अतिशय तत्परतेने खाजगी मालमत्तेसाठी शासकीय निधीतून रस्ता व पूल बांधण्याच्या हेतूबाबत संशय निर्माण झाल्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८५) | ५५०९ | १० | जळगाव महानगरपालिकेची मालमत्ता असलेल्या जळगाव शहरातील गट नं. ७८ व ७९ या जागेचा ताब्या घेण्यासाठी महानगरपालिकेकडून दिरंगाई केली जात असणे, त्यामुळे याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री यांच्याकडे दि. १४ मार्च २०२३ रोजी वा त्यासुमारास तक्रार केलेली असणे, जळगाव शहरातील महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या मेहरूण गट नं. ७८ व ७९ या अनुक्रमे ६.१० व ५.११ आर.चौ.मी जागेचा खाजगी विकासकाकडून लग्न सभारंभासाठी भाड्याने देवून वाणिज्यिक वापर करण्यात येत असल्यामुळे जळगाव महापालिकेचे आर्थिक नुकसान होत असणे, सदर मिळकत ही महानगरपालिकेची मालमत्ता असल्यामुळे ही मिळकत ताब्यात घेण्याबाबत दि. २१ सप्टेंबर २०२२ रोजी नागरिकांनी जळगाव महानगरपालिकेच्या आयुक्तांना निवेदन दिलेले असणे, या प्रकरणाची जिल्हाधिकारी जळगाव यांचे समोर सुनावणी चालू असणे, सुनावणी दरम्यान जळगाव जिल्हाधिकाऱ्यांनी मनपा आयुक्त यांना दि. १५/२/२०२३ रोजी गट नंबर ७८ व ७९ चा ले आऊट रद्द करण्याचे निर्देश दिलेले असणे, मात्र महानगरपालिका आयुक्तांकडून ले- |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आऊट करण्यासाठी दिरंगाई व टाळाटाळ केली जात असणे, त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत असणे, महानगरपालिका आयुक्तांनी हा ले-आऊट रद्द करावा किंवा ही ॲम्यूनिटी ताब्यात घेण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८६) | ५५११ | १० | नाशिक शहरातील रस्त्याच्या कामांची गुणवत्ता खराब व दर्जाहीन असल्याबाबतच्या तक्रारींवर कारवाई करण्यासाठी दिरंगाई केली जात असणे, नाशिक महानगरपालिकेने गेल्या अडीच वर्षात केलेल्या साडेसहाशे कोटींच्या रस्त्यांची पावसाळ्यात अक्षरशः चाळण झाल्यामुळे विविध संघटनांकडून माहे सप्टेंबर मध्ये वा त्या सुमारास आंदोलने करण्यात आलेले असणे, नाशिक शहरातील रस्त्याच्या कामांची गुणवत्ता खराब व दर्जाहीन असल्याबाबत नाशिक महानगरपालिकेला माहे सप्टेंबर मध्ये असंख्य तक्रारी प्राप्त झालेल्या असणे, नाशिक शहरात दर्जेदार रस्ते तयार करण्यासाठी या कामांची त्रयस्थ संस्थेमार्फत तपासणी करण्याचा नाशिक महानगरपालिकेने माहे ऑगस्ट मध्ये निर्णय घेतलेला असणे, रस्त्याच्या कामांची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी बांधकाम विभागासह गुणवत्ता नियंत्रण विभागाची असूनही प्रत्यक्षात या विभागांमार्फत कोणावरही कारवाई करण्यात आलेली नसणे,सन २०१९ ते २०२२ या तीन वर्षांत सुमारे एक हजार कोटी रुपयांच्या रस्त्यांची कामे झालेली असणे, परंतु तीन वर्षे होण्याच्या आतच गेल्या पावसाळ्यात शहरातील सर्व रस्त्यांची चाळण झालेली असणे, खड्यामध्ये रस्ते शोधण्याची वेळ नाशिककरांवर आलेली असणे, रस्त्यांच्या झालेल्या दुर्दशेमुळे नागरिक त्रस्त झाल्यामुळे या खड्डयांविरोधात ठिकठिकाणी आंदोलने करण्यात आलेली असणे, महानगरपालिकेने रस्ते दुरुस्तीसाठी ठेकेदारांना वेळोवेळी मुदती देण्यासह त्यांना काळ्या यादीत टाकण्याचे इशारे दिलेले असणे, प्रत्यक्षात महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत निकृष्ट काम केलेल्या ठेकेदारांवर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे, रासात्यांच्या कामांची तपासणी त्रयस्थ पार्टीमार्फत करण्याची केवळ घोषणा करण्यात आलेली असणे,मात्र याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (८७) | ५४९० | १० | नगरपरिषदांना वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजना/ ठोक तरतुद / रस्ते अनुदान योजना यासह इतर योजनेमधून राज्य शासनाने चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषद येथील विविध विकासकामांना १ एप्रिल २०२१ या वर्षापासून तर आतापर्यंत निधीसह प्रशासकीय मान्यता देऊन मंजूरी देणे, यासर्व कामांना तांत्रिक मान्यता मिळणे, आता कामाला प्रत्याक्षात सुरवात होणार तेच शासनाने माहे जुलै २०२२ रोजी परिपत्रक काढून १ एप्रिल २०२१ पासून तर आतापर्यंत मंजूर झालेल्या/निविदा प्रक्रिया न झालेल्या/निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन वर्क आर्डर न दिलेल्या/वर्क आर्डर देऊन काम न सुरू केलेल्या अशा सर्व कामांना स्थगिती देण्यात येत असल्याचे सर्व विभागाला कळविलेले असणे, त्यामूळे ब्रम्हपूरी नगरपरिषद मधील मंजूर असलेली सर्व विकासकामे ठप्प झाल्यामूळे अनेक समस्या निर्माण होणे, त्यामूळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामूळे राज्य शासनाने अनेक कामावरील स्थगिती |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | उठविलेली असल्याने त्याच धर्तीवर माहे जुलै २०२२ च्या सुमारास राज्य शासनाने दिलेली स्थगिती रदद करूनन ब्रम्हपूरी नगरपरिषद मधील सर्व विकासकामे पुवर्वत सुरू राहण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (८८) | ५५१२ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायत येथील पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या लक्षात घेता सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायतीने अमृत -२ या योजनेतून यांनी ७० कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करणे, या प्रस्तावास महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाकडून तांत्रिक मान्यता घेऊन अंतिम मान्यतेसाठी परिपुर्ण प्रस्ताव संचालक, नगरपरिषद नगरप्रशासन विभाग, मुंबई यांच्याकडे गेल्या दोन महिण्यापुर्वी सादर करणे, सदर प्रस्तावास तपासणी करून अंतिम मान्यता मिळण्यासाठी प्रधान सचिव नगरविकास विभाग मंत्रालय मुबई यांच्याकडे सादर करणे आवश्यक असतांना अघापही सदर प्रस्ताव संचालक,नगरप्रशासन विभाग,मुंबई यांच्याकडे प्रलंबित असणे, सिंदेवाही-लोनवाही नगरपंचायत अंतर्गत शहरातील येथील पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या लक्षात घेता प्राप्त झालेल्या पाणी पुरवठा योजनेस अमृत -२ या योजेतून मंजूर करणे व तसेच निधीसह प्रशासकीय मान्यता मिळणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (८९) | ५५२१ | १० | नगरपरिषद/नगरपंचायतींना वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजना/ ठोक तरतुद / रस्ते अनुदान/वैशिष्टपुर्ण योजना यासह इतर योजनेमधून राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात राज्यातील अनेक शहरासाठी विविध विकास कामे मंजूर करून त्यासाठी करोडो रूपयांचा निधी उपलब्ध करून देणे, त्याच धर्तीवर चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही नगरपंचायत येथील विविध विकासकामे मंजूर करून त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे आवश्यक असतांना सुध्दा अद्यापही विकासकामांना निधीसह मंजूरी देण्यात आलेली नसणे, त्यामूळे निधी अभावी कामे करता येत नसल्यामूळे दिवसेंदिवस शहरात अनेक समस्या निर्माण होत असल्यामूळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामूळे राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात नगरविकास विभागामार्फतीने राज्यातील अनेक शहरासाठी करोडो रुपयांचे निधी व्दारे विकासमाके मंजूर केले आहे त्याच धर्तीवर नगरविकास विभागाकडून नगरपरिषद/नगरपंचायतींना वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजना/ ठोक तरतुद / रस्ते अनुदान/वैशिष्टपुर्ण योजना यासह इतर योजनेमधून चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही नगरपंचायत मधील विविध विकासकामांना प्रत्येकी ५० कोटी रुपयांचे निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (९०) | ५५२३ | १० | नगरपरिषद/नगरपंचायतींना वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजना/ ठोक तरतुद / रस्ते अनुदान/वैशिष्टपुर्ण योजना यासह इतर योजनेमधून राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात राज्यातील अनेक शहरासाठी विविध विकास कामे मंजूर करून त्यासाठी करोडो रूपयांचा निधी उपलब्ध करून देणे, त्याच धर्तीवर चंद्रपूर जिल्हयातील सावली नगरपंचायत येथील विविध विकासकामे मंजूर करून त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आवश्यक असतांना सुध्दा अद्यापही विकासकामांना निधीसह मंजूरी देण्यात आलेली नसणे, त्यामूळे निधी अभावी कामे करता येत नसल्यामूळे दिवसेंदिवस शहरात अनेक समस्या निर्माण होत असल्यामूळे नागरिकांत पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, त्यामूळे राज्य शासनाने गेल्या चार महिन्यात नगरविकास विभागामार्फतीने राज्यातील अनेक शहरासाठी करोडो रुपयांचे निधी व्दारे विकासमाके मंजूर केले आहे त्याच धर्तीवर नगरविकास विभागाकडून नगरपरिषद/नगरपंचायतींना वैशिष्टयपुर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजना/ ठोक तरतुद / रस्ते अनुदान/वैशिष्टपुर्ण योजना यासह इतर योजनेमधून चंद्रपूर जिल्हयातील सावली नगरपंचायत मधील विविध विकासकामांना निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २० मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) नगर विकास विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई